अंतरंग
सोलनपाडा धरणाला गळती; ग्रामस्थांचे स्थलांतर/२
रविवारनिमित्त विविध विषयांवरील लेख/४, ५
विराटचे विक्रमी शतक; ब्रॅडमन यांच्याशी बरोबरी/८



रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक ६
www.ramprahar.com

# राम प्रहर

रविवार, २३ जुलै २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २



**पाहिजेत**

**श्री धूतपापेश्वर आयुर्वेद ट्रस्ट संचालित, आरोग्यमंदिर, आयुर्वेद चिकित्सालय व पंचकर्म केंद्र, पनवेल,** येथे **पुरुष मसाज थेरपिस्ट,** ह्या पदासाठी, पूर्णवेळ, कायम तत्त्वावर, जागा भरणे आहे. पंचकर्म थेरपिस्ट विषयातील प्रमाणपत्र किंवा/आणि किमान एक वर्षाचा पंचकर्म केंद्रात काम केल्याचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तरीही इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून एका आठवड्याच्या आत संस्थेशी संपर्क साधावा.

संपर्क क्रमांक : (०२२) ६२३४६४५१/५२/५३


### इर्शाळवाडी दुर्घटनेवर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सहवेदना

# केंद्र सरकार भक्कमपणे पाठीशी



## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माहिती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी (दि. २२) सहकुटुंब पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. महाराष्ट्रातील जनतेचे आयुष्य सुखकर करण्यासाठी राबविल्या जाणाऱ्या विकासकामांबाबत पंतप्रधानांनी या वेळी चर्चा केल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. इर्शाळवाडीतील दुर्घटनेमुळे राज्यावर दुःखाचा डोंगर कोसळला असून त्याबाबत पंतप्रधानांनी सहवेदना व्यक्त करीत या संकटात केंद्र सरकार पाठीशी असल्याचे ते म्हणाले तसेच बचावकार्य आणि पुनर्वसनाबाबत माहिती घेतली, असेही मुख्यमंत्र्यांनी ट्विटरवरून सांगितले

कोकणात उदंड पाऊस पडून पाणी समुद्राला मिळते. हे पाणी दुष्काळग्रस्त भागात कसे वळवता येईल तसेच मराठवाडा वॉटर ग्रीड या राज्य सरकारच्या योजनेबाबतही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या वेळी माहिती घेतली. राज्यातील आरोग्य व्यवस्था, उपलब्ध शैक्षणिक सुविधा, आवश्यक बदल या मुद्द्यांवरही त्यांनी चर्चा केली, असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

धारावी पुनर्विकास हा सर्वांत मोठा प्रकल्प असून त्यामुळे मुंबईचा चेहरा बदलणार आहे. त्याचबरोबर गरीब नागरिकांना सुखाचे आयुष्य जगता येणार आहे. त्यामुळे हा प्रकल्प विनाअडथळा वेगाने पूर्ण करावा, रखडलेले पुर्नविकास प्रकल्प मार्गी लावावेत, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले. गेले वर्षभर केंद्र सरकारचे भक्कम पाठबळ राज्य सरकारला मिळत आहे. ते सहकार्य यापुढेही कायम मिळो ही मागणी मान्य करीत पंतप्रधानांनी आश्वस्त केले, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी आपल्या ट्वीटमध्ये म्हटले आहे.



## पुरामुळे मराठवाडा आणि विदर्भाचा संपर्क तुटला

**नांदेड : प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यात पावसाचा कहर सुरूच असून शनिवारी (दि. २२) तिसऱ्या दिवशी किनवट आणि माहूर तालुक्यात पूर परिस्थिती निर्माण झाली. पैनगंगा नदीला पूर येऊन पुलावरून पाणी वाहत असल्याने मराठवाडा आणि विदर्भाचा संपर्क तुटला आहे.

मुसळधार पावसामुळे मराठवाडा आणि विदर्भाच्या सीमेवर असलेल्या पैनगंगा नदीला पूर आला आहे. पुलावरून मोठ्या प्रमाणात पाणी वाहत आहे. मोमीनपुरा आणि गंगापनगर या भागात पुराचे पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेकांच्या घरात पाणी साचले आहे. जिल्हा प्रशासनाने बचावकार्य राबवत ८० नागरिकांना उर्दू शाळेत स्थलांतरित केले आहे.

### यवतमाळमध्ये बोटीने पूरग्रस्तांना वाचवले

**यवतमाळ :** जिल्ह्यात अनेक गावांना पुराने वेढा घातला आहे. जिल्ह्यातील महागाव तालुक्यात आनंदनगर तांडा येथे पुराच्या पाण्यामुळे सुमारे ८० लोक अडकले. या अडकलेल्या लोकांना बोटीच्या सहाय्याने बाहेर काढण्यात येत होते. त्यासाठी मोहीम राबविण्यात आली.

### बुलढाण्यात हाहाकार

**बुलढाणा :** जिल्ह्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या संग्रामपूर आणि जळगाव जामोद तालुक्यात पावसाने हाहाकार माजवला आहे. दोन्ही तालुक्यांतील अनेक गावांना पुराच्या पाण्याचा वेढा पडला. अतिवृष्टीमुळे जवळपास १४० गावांचा संपर्क तुटला आहे, तर अनेक मार्ग बंद पडले आहेत.

## जोरदार पावसामुळे बचावकार्यात अडथळा; मृतांचा आकडा २७वर



**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील दरडग्रस्त इर्शाळवाडीतील बचावकार्यात जोरदार पावसाचा अडथळा येत आहे. दरम्यान, एनडीआरएफच्या पथकाला शनिवारी (दि. २२) आणखी पाच मृतदेह सापडले असून या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांचा आकडा २७वर गेला आहे.

एनडीआरएफच्या जवानांसह स्वयंसेवक व नातेवाईक ढिगाऱ्याखाली कुणी सापडतेय का याचा शोध घेत आहेत. दुर्घटनाग्रस्त वाडीवर तुफान पाऊस, सोसाट्याचा वारा आणि दाट धुके आहे. बचावकार्यातील लोक या परिस्थितीतही नेटाने काम करीत आहेत. स्थानिक आमदार महेश बालदी या ठिकाणी प्रत्येक गोष्टीवर त्यांचे लक्ष आहे. दरम्यान, यवतमाळमधील आमदार डॉ. संदीप धुर्वे यांनी शनिवारी बेस कॅम्पवर येऊन पाहणी केली, तर विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी नढाळ येथे दुर्घटनाग्रस्तांसाठी तात्पुरत्या स्वरूपात उभारण्यात आलेल्या निवारा केंद्रास भेट देऊन त्यांचे सांत्वन केले.

## इतर व्यक्तींना प्रवेशास निर्बंध

**अलिबाग : प्रतिनिधी**

इर्शाळवाडीत नैसर्गिक आपत्तीमुळे दरड कोसळलेल्या ठिकाणी व त्याच्या परिसरात इर्शाळगड, नंबराची वाडी, बेस कॅम्प परिसरात शासकीय मदत यंत्रणा तसेच मदतकार्यात नेमणूक केलेल्या इतर व्यक्ती, सेवाभावी संस्था यांच्या व्यतिरिक्त इतर नागरिक, पर्यटक व ट्रेकर्स यांना प्रवेशास निर्बंध करण्यात आला आहे.

फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३चे कलम १४४ (१) नुसार २३ जुलै ते ६ ऑगस्ट या कालावधीसाठी प्रतिबंधात्मक आदेश उपविभागीय दंडाधिकारी अजित नैराळे यांनी लागू केलेत.

## सगळे संपले! आता जगायचे कशासाठी?

### कुटुंबात एकटे वाचलेले उद्विग्न





**खालापूर : प्रतिनिधी**

नाही आई, बाबा, ना भाऊ, बहीण, ना काका काकू, ना आजी आजोबा... आधारच संपला आहे... मदत मिळत आहे, पण आता जगायचं कशासाठी, असा प्रश्न रंजना भाऊ भुतांबरा या १३ वर्षीय मुलीला पडला आहे. आश्रमात नसतू त काय ठांवा, असा ठाकरी भाषेत तिने हंबरडा फोडला.

इर्शाळवाडीतील रंजना भाऊ भुतांबरा ही पनवेल तालुक्यातील चिपळे येथील आश्रमशाळेत इयत्ता आठवीत शिकते. ज्या दिवशी घटना घडली त्या दिवशी रंजना शाळेत गेली आणि सकाळी ही दुःखद घटना तिला कळली. ती एकटीच या घरातून वाचली. तिचा चुलत भाऊ हाही एकटाच असून त्याच्या कुटुंबातील नऊ जण मातीच्या ढिगाऱ्याखाली दबले गेले, तर जयश्री किसन वाघ (वय १८) ही पनवेल येथील आश्रमशाळेत राहून बारावीत शिक्षण घेते. दुर्घटना घडली त्या दिवशी तीही पनवेल नेरे येथे होती. तिच्या आई, वडिलांसह सात जण मातीखाली गाडले गेले आणि कुटुंबामध्ये तीदेखील आता एकटीच उरली आहे. आई-वडील येतील या भिरभिरत्या नजरेने ती वाट पाहत आहे.

## निवडक

### पश्चिम बंगालमध्येही दोन महिलांना विवस्त्र करून मारहाण

**कोलकाता :** मणिपूर हिंसाचारामध्ये जमावाने दोन महिलांना नग्न करीत त्यांची धिंड काढल्याचे प्रकरण ताजे असतानाच पश्चिम बंगालच्या मालदा जिल्ह्यात दोन आदिवासी महिलांना विवस्त्र करून मारहाण करण्यात आली आहे. बामनगोला येथील आठवडी बाजारात या महिला आपली उत्पादने विकत असताना त्यांना इतर महिलांनी चोरीच्या आरोपाखाली पकडले आणि चपलने मारत कपडे फाडले. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. दरम्यान, मणिपूरमध्ये दोन महिलांची विवस्त्र धिंड काढल्याप्रकरणी पोलिसांनी आणखी एका आरोपीला अटक केली आहे.


उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष लेख वाचा


## पुणे-रायगडला जोडणाऱ्या वरंधा घाट बंदचे आदेश

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्याहून भोरमार्गे कोकणात जाण्यासाठी भोर तालुक्यातील वरंधा घाट हा सोपा मार्ग आहे, पण हवामान खात्याकडून अलर्ट देण्यात आल्याने प्रशासनाकडून वरंधा घाट सर्व वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.

याबाबत प्रशासनाने आदेश काढले आहेत, मात्र आदेश काढूनही अनेक वाहने या घाटातून प्रवास करताना पाहायला मिळाली. अखेर रायगड जिल्हा प्रशासनाने पुणे आणि रायगड जिल्ह्याच्या सीमेवर अनेक ठिकाणी मुरुमाचे ढिगारे टाकून रस्ता वाहतुकीसाठी बंद केला आहे. २२ ते ३० सप्टेंबरपर्यंत हा रस्ता वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे.

हवामान खात्याकडून अलर्ट असताना हलक्या वाहनांसह वरंधा घाटातील सर्व प्रकारची वाहतूक बंद राहणार आहे. या घाटात पावसाळ्यामध्ये अनेकदा अतिवृष्टी होऊन दरडी कोसळण्याचे प्रकार घडत आहेत. त्यात रस्ता खचणे, मोठी झाडे पडणे, रस्त्यावरची माती वाहून जाणे अशा अनेक घटना घडत असतात. त्यामुळे प्रशासनाकडून हा रस्ता बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासनाकडून ही दक्षता घेण्यात येत आहे.

## राज्यात ठिकठिकाणी भाजपचे सेवाकार्य

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा वाढदिवस सेवा दिन म्हणून साजरा

**मुंबई : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील दुर्घटनेमुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस प्रदेश भारतीय जनता पक्षातर्फे सेवा दिन म्हणून साजरा करण्यात आला. यानिमित्त राज्यात रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, नेत्रदान शिबिर, कृत्रिम अवयवांचे वाटप, पूरग्रस्त कुटुंबांना धान्य वाटप असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

नागपूर येथे आयोजित शासन आपल्या दारी कार्यक्रमामध्ये प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, नागपूर शहर अध्यक्ष जितेंद्र कुकडे यांच्या प्रमुख उपस्थितीत सुमारे १५ हजार नागरिकांना सरकारी खात्यांकडे प्रलंबित असलेली विविध शासकीय कागदपत्रे देण्यात आली.

मुंबईत धारावीतील गणेश




विद्यामंदिर येथे राज्याचे कौशल्य विकासमंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रवीण दरेकर, ज्येष्ठ पत्रकार किरण शेलार, भाजप प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांच्या प्रमुख उपस्थितीत गरीब कुटुंब आणि सफाई कामगार यांना धान्य वाटप करण्यात आले. कांदिवली (पश्चिम) येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान करणाऱ्यांना खासदार गोपाळ शेट्टी, बाळा तावडे, कमलेश यादव, प्रतिभा गिरकर यांच्या उपस्थितीत प्रमाणपत्रे देण्यात आली.

लातूर येथे भाजप मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांच्या हस्ते स्वच्छता कार्य करणाऱ्या भगिनींचा सत्कार आणि रेनकोट वितरण करण्यात आले. आमदार रमेशअप्पा कराड, शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, ग्रामीण अध्यक्ष दिलीप देशमुख, प्रदेश प्रवक्ते गणेश हाके, प्रेरणा होनराव यांची प्रमुख उपस्थिती होती.


ठाणे येथे आमदार निरंजन डावखरे यांच्यातर्फे वाल्मिकी बांधवांना आणि महिला रिक्षाचालक भगिनींना रेनकोट व धान्यवाटप करण्यात आले. माजी राज्यसभा सदस्य डॉ. विनय सहस्रबुद्धे, आमदार संजय केळकर, जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, नम्रता कोळी, सरचिटणीस विलास साठे, राजू सावंत उपस्थित होते. डहाणू येथे ज्येष्ठ नेते कृपाशंकर सिंह यांच्या उपस्थितीत महिलांना शिलाई मशीन आणि अन्न धान्याचे वाटप करण्यात आले. (पान २ वर..)

**प्रवीण दरेकर,** आमदार
माजी विरोधी पक्षनेते, विधान परिषद

# त्यागी, संयमी, विनयशील व मुत्सद्दी नेतृत्व

*राजकीय जीवनात किती उंची गाठायची याचा विचार करू नका, जनतेसाठी आणि पक्षासाठी आपण किती उंचीचे काम करू शकतो याचा विचार सातत्याने मनात ठेवा आणि त्यासाठी झोकून देऊन काम करा, असे विचार सातत्याने आमच्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांच्या मनावर बिंबवणारे गुरुतुल्य मार्गदर्शक, उपमुख्यमंत्री, आमचे नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस यांचे वाढदिवसाप्रीत्यर्थ सर्वप्रथम मी अभीष्टचिंतन करतो.*

भाजपने विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी दिल्यानंतर खऱ्या अर्थाने ही जबाबदारी पार पाडण्याचे बळ आणि मार्गदर्शन मला त्यांच्याकडून लाभले. या काळात अत्यंत जवळून या विविधांगी व्यक्तिमत्त्वाला जाणून घेण्याचे भाग्यही मला मिळाले. राज्यातील अनेक प्रश्न आम्ही त्यांच्याकडे घेऊन जायचो. जात, धर्म, पंथ, पक्ष, आपला, परका यापलीकडे जाऊन त्या प्रश्नांचा अभ्यास करणे आणि त्यावरील उपाय शोधणे ही त्यांची साधी कार्यपद्धती आहे आणि म्हणूनच पक्षातीलच नाही, तर अन्य पक्षातीलही नेते, कार्यकर्ते त्यांचा सल्ला कधी उघडपणे, तर कधी अपरोक्षपणे घेताना आम्ही पाहिले आहे. जनतेच्या प्रश्नांच्या बाबतीत किंवा विकासकामांच्या बाबतीत त्यांनी राजकारण कधी आडवे आणले नाही. ओबीसी, मराठा आरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला, एसटी कर्मचाऱ्यांचा प्रश्न निर्माण झाला, महिला अत्याचाराच्या संदर्भातील कायदा करण्याचा विचार आला, कोरोना महामारीसारखी किंवा चक्रीवादळ, नैसर्गिक आपत्तीसारखी विपदा राज्यावर आली त्या वेळी जेव्हा जेव्हा सरकारने विरोधी पक्षाचे सहकार्य मागितले त्या त्या वेळी त्यांनी ते देण्याचेच नाही तर सरकारला सहाय्यभूत ठरतील,



अशा विधायक सूचना करण्याचे कामही केले, हे संपूर्ण महाराष्ट्र जाणतो, पण त्याचवेळी सरकारच्या धोरणातील विसंगती, चुका, भ्रष्टाचार, अनियमितता, जनतेच्या प्रश्नांकडे होणारे दुर्लक्ष याबाबतीत त्यांनी महाविकास आघाडी सरकारची लक्तरे वेशीवर टांगण्यासही मागे पुढे पाहिले नाही. अधिवेशनात सरकारला घाम फोडण्याचे कामही त्यांनी चोख बजावले. व्यक्तिगत या दाव्यांना त्यांच्याकडे थारा नसतो. त्यामुळे पक्षीय असो वा इतर पक्षातील नेत्यांशी व्यक्तिगत संबंध कधी बिघडले नाहीत.

देवेंद्रजी ग्रासरूटवर काम करणारे, जनमानसातील नेते आहेत. कोकणावर लागोपाठ आलेल्या चक्रीवादळाचे संकट, राज्यातील विविध भागांत आलेल्या नैसर्गिक आपत्ती, सातारा, सांगली, कोल्हापुरात आलेला महापूर आणि अलीकडेच आलेलं कोविडचं संकट असेल अशा सर्व काळात देवेंद्रजी घरात बसून नव्हते, तर ते जनतेच्या दारात आणि शेतकऱ्यांच्या बांधावर होते. कोल्हापूरच्या महापुराचे संकट त्यांनी ज्या प्रकारे हाताळलं तो प्रशासनासाठी एक मानदंड ठरला आहे. मुख्यमंत्री म्हणून त्यांनी मदतीचा काढलेला शासन निर्णय आजही आयडियल समजला जातो.

नैसर्गिक आपत्तीनंतर देवेंद्रजी यांच्याबरोबर एकत्रितपणे केलेल्या दौऱ्यातील एक प्रसंग मला आठवतो. त्याच काळात महाविकास आघाडीचे मुख्यमंत्रीही पाहणी दौऱ्यावर होते. माध्यमांनी या दोन दौऱ्यांची तुलना आपापल्या पद्धतीने केली होती. पावसाचा खूप जोर होता, सगळीकडे पाणीच पाणी होते, रस्त्यावरून किंवा टेकडीवरून पाहणी न करता देवेंद्रजी स्वतः नदीत उत्तरले, चिखल तुडवत शेतकऱ्यांच्या बांधावर गेले, नुकसानीबाबत चर्चा केली, त्यांचे दुःख समजून घेतले आणि दुसऱ्या बाजूला सोलापुरात तत्कालीन मा. मुख्यमंत्री स्टेजवर अतिवृष्टीचा आढावा घेत होते. कुणावर टीका करणे, हा उद्देश नाही. पण देवेंद्रजींची काम करण्याची पद्धत सांगण्याचा हा प्रयत्न आहे. मला आठवतंय, २०१९ आणि २०२०मध्ये राज्यात चक्रीवादळ, महापूर, अतिवृष्टीसारख्या नैसर्गिक आपत्ती आल्या त्या वेळी संपूर्ण महाराष्ट्र त्यांनी पालथा घातला.

माननीय देवेंद्रजी विरोधी पक्षनेते असताना त्यांच्याकडे पॉवर सेंटर म्हणून पाहिले जात होते एवढा वचक त्यांनी त्यांच्या कामातून निर्माण केला होता. विरोधी पक्षनेता म्हणून सभागृहात आज देवेंद्रजी काय बोलतील, कुणाची लक्तरे वेशीवर टांगतील, शासन, प्रशासनातील कोणता भ्रष्टाचार बाहेर निघेल, याची भीती सत्तारूढ पक्षाला आणि अधिकाऱ्यांमध्ये होती. गिरीश महाजन यांच्या संदर्भातील सीडी सभागृहात त्यांनी सादर केली असेल किंवा नवाब मलिकांच्या अतिरेक्यांशी संबंधांचा पर्दाफाश केला असेल किंवा अंटेलिया प्रकरण दाबले जात असल्याचे पुरावे सभागृहात मांडले असतील, अशा अनेक प्रसंगात कणखर विरोधी पक्षनेता आपण त्यांच्यात पाहिला.

आजकाल प्रत्येक जाहिरातीत २४x७ असे छापलेले असते, म्हणजे त्यांची सेवा आठवड्यातील २४ तास उपलब्ध असते. देवेंद्रजी हेदेखील कार्यकर्ते, नेते आणि जनता यांच्यासाठी २४ तास उपलब्ध असतात. मुख्यमंत्री असताना दिवसाचे १८-१८ तास ते काम करायचे याचा अनुभव सर्वांनी घेतलाय, पण विरोधी पक्षनेते असतानाही ते १८-१८ तास व्यस्त असायचे हा अनुभव खरंच विरळा आहे. देवेंद्रजी यांच्या संयमाची परिसीमाही महाराष्ट्राच्या राजकारणाने पाहिली आहे. देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या कुटुंबीयांवर अत्यंत खालच्या थराला जाऊन टीका झाली. यात केवळ कार्यकर्ते नव्हते, तर काही राजकीय पक्षाचे मोठे नेतेदेखील होते, परंतु प्रत्येक वेळी त्यांनी ही टीका संयमाने पचवली. त्यांचे एकच प्रिन्सिपल आहे आणि ते आम्हालाही सांगतात, टीकेला टीकेने उत्तर देऊ नका, आपल्या कामाने उत्तर द्या.

(उर्वरित मजकूर पान ४ वर..)

# इर्शाळवाडी दुर्घटनेतील बचावलेल्या मुलांचे मुख्यमंत्र्यांनी स्वीकारले पालकत्व

## विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हेंची माहिती

**अलिबाग : प्रतिनिधी**

इर्शाळवाडी येथे दुर्घटनेत बचावलेल्या अनाथ मुलांचे पालकत्व राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वीकारले असून अचानक कोसळलेल्या मोठ्या नैसर्गिक आपत्तीमध्ये देखील शासन मोठ्या ताकदीने त्यांच्या पाठीशी उभे आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले.





उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी शनिवारी (दि. २२) नढाळ येथे दुर्घटनेतील पीडितांच्या तात्पुरत्या निवारा केंद्रास भेट देऊन त्यांचे सांत्वन केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने त्यांनी पालकत्व स्वीकारल्याचे या वेळी जाहीर केले. सोबत आमदार मनीषा कायंदे, आमदार महेंद्र थोरवे, अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्प अधिकारी शशिकला अहीरराव, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुख मंगेश चिवटे उपस्थित होते.

या मुलांशी संवाद साधताना डॉ. गोऱ्हे यांनी मुलांना लगेच कामाला न जाता शिक्षण पूर्ण करण्याबाबत सांगितले. काहीही लागल्यास त्यांच्या फोनवर संपर्क साधण्याकरिता स्वतःचा नंबर अनाथ मुलांना दिला तसेच गावातील स्थानिक व्यक्ती ज्याला आपण सर्व ओळखता त्यांच्या संपर्कात राहण्याच्या सूचनाही त्यांनी मुलांना केली.

डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेने या इर्शाळवाडी दुर्घटनेतील या अनाथ मुलांचे पालकत्व स्वीकारले आहे. ही मुले १८ वर्षांची पूर्ण होईपर्यंत त्यांच्या शिक्षण व पालनपोषणाची जबाबदारी संस्थेने घेतली असून त्यांच्या आवश्यक त्या सर्व गरजा पूर्ण करण्यात येणार आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन ही स्वयंसेवी आहे. खा. डॉ. शिंदे यांनी या वेळी दूरध्वनीद्वारे संबंधितांशी संवाद साधला. स्वतः मुख्यमंत्री या संपूर्ण घटनेवर आणि मदतकार्यावर लक्ष ठेवून आहेत. शंभर टक्के पुनर्वसन होईपर्यंत मदत कार्य सुरू राहील, असा विश्वास या वेळी दुर्घटनाग्रस्त मुलांना देण्यात आला तसेच मदत साहित्याचे वितरण करण्यात आले. आमदार मनीषा कायंदे व स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांनीदेखील मुलांशी संवाद साधला.

राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यापूर्वीदेखील २०२० साली महाड येथील तारीक गार्डन या दुर्घटनाग्रस्त इमारतीत बचावलेल्या दोन लहान बालकांचे संपूर्णता पालकत्व स्वीकारले होते तसेच २०२१ साली पालघर येथे रोजगाराअभावी आत्महत्या केलेल्या कामगार दाम्पत्यांच्या दोन मुलांचे होते.

# सोलनपाडा धरणाला गळती

## ग्रामस्थ भयभीत; प्रशासनाकडून स्थलांतर

**नेरळ, कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील सोलनपाडा येथील पाझरतलावाला गळती लागली आहे. तलावाच्या बांधामधून होणारी गळती रोखण्यासाठी केले जात असलेले दुरुस्तीचे काम अर्धवट असून पाझर तलाव फुटण्याची भीती स्थानिक ग्रामस्थांकडून व्यक्त होऊ लागली आहे. त्यामुळे प्रशासनाने ग्रामस्थांचे गावाच्या जवळच असलेल्या विजयभूमी येथे स्थलांतर केले आहे.



दरम्यान, धरणाला गळती लागली असल्याचे ग्रामस्थानी अनेकदा पाटबंधारे विभागाला कळवूनदेखील सोलनपाडा पाझर तलाव (धरण) याची लघु पाटबंधारे विभागाकडून सेफ्टी ऑडिट केलेच नसल्याची बाब समोर आली आहे.

कर्जत तालुक्यामध्ये शेतीसाठी उपयुक्त असे पाझर तलाव पूर्वी करण्यात आले होते. यातून पाझरणाऱ्या पाण्यातून शेती, गुरे व ग्रामस्थ यांच्यासाठी पाण्याची सोय होत असे. १९८० मध्ये रायगड जिल्हा परिषदेने जामरूख भागातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी सोलनपाडा येथे पाझर तलाव म्हणजेच छोट्या स्वरूपाचे धरण बांधले. त्यानंतर २००९ मध्ये डोंगरपाडा येथील पाथरज पाझर तलाव फुटल्यानंतर सोलनपाडा, जामरूख तसेच परिसरातील १० गावांमधील ग्रामस्थांनी तत्कालीन पालकमंत्री सुनील तटकरे आणि तत्कालीन आमदार सुरेश लाड यांची डोंगर पाडा येथे भेट घेत सोलनपाडा बाबतदेखील आपबिती मांडली होती. त्यामुळे जामरूख पाझर तलाव दुरुस्तीसाठी शासनाने पाच कोटींचा निधी मंजूर केला व या पाझर तलावाची दुरुस्ती झाली, मात्र त्यानंतर पुन्हा पाझर तलावाच्या बांधामधून पाण्याची गळती सुरूच झाली.

नुकत्याच खालापूर तालुक्यातील इर्शाळगड येथील घटनेने संबंध महाराष्ट्र हादरला असताना धरणाला लागलेल्या गळतीमुळे धरण कधीही फुटून दुर्घटना होऊ शकते. या भीतीने आता ग्रामस्थांची झोप उडाली आहे. सोलनपाडा पाझर तलावाच्या पिचिंग केलेल्या भागात दुसऱ्या टप्प्यापासून पाण्याची गळती सुरु असल्याचे नितेश कडलक, पंढरीनाथ सावंत, अशोक थरकुडे, भावेश थरकुडे, रंजित बांगर, करण सावंत, निखिल बांगर, रूपेश बांगर यांनी व इतर ग्रामस्थांनी लक्षात आणून दिले. त्यामुळे प्रशासनाने तत्काळ सोलनपाडा येथे धाव घेत धरणाची पाहणी केली तर सुरक्षेचा उपाय म्हणून २१ जुलै रोजी सोलनपाडा गावाला जवळच्या विजयभूमी युनिव्हर्सिटीमध्ये तात्पुरते स्थलांतरित केले आहे.

**गळती रोखण्याचे काम मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेमधून सुरू असून आम्ही पाण्याची गळती सुरू असल्याची माहिती मिळताच तत्काळ रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष यांना कळविले आहे.**

**-सुजित धनगर, उपविभागीय जलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधारे विभाग, रायगड जिल्हा परिषद**

# उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त रायगडात विविध उपक्रम

## पेण उपजिल्हा रुग्णालयात फळवाटप



**पेण : प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री व भारतीय जनता पक्षाचे राज्यातील खंबीर नेतृत्व देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पेण उपजिल्हा रुग्णालयात माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांच्या हस्ते रुग्णांना फळवाटप करण्यात आले.



या वाटपावेळी माजी उपनगराध्यक्ष वैशाली कडू, रघुनाथ बोरेकर, माजी नगरसेवक जनार्दन जाधव, प्रकाश रामाणे, महिला मोर्चा शहर अध्यक्षा सुप्रिया चव्हाण, युवा मोर्चा शहर अध्यक्ष मितेश शहा, भाजप शहर सरचिटणीस रवींद्र म्हात्रे, उपाध्यक्ष अशोक म्हात्रे, प्रशांत तेलवणे आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. आमचे नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार वाढदिवस हा कार्यकर्त्यांनी सेवा कार्य करून साजरा करण्यास सांगण्यात आले होते. त्याप्रमाणे आम्ही कार्यकर्त्यांनी पेण उपजिल्हा रुग्णालयात फळवाटप करून वाढदिवस साजरा केला असून येथील रुग्ण लवकरात लवकर बरे व्हावे, अशा सदिच्छा माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी व्यक्त केल्या.

या वेळी रुग्णालयातील डॉ. सोनावणे यांचाही वाढदिवस असल्याने भाजपतर्फे त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी रुग्णालयातील डॉक्टर, अधिकारी, परिचारिका व कर्मचारी उपस्थित होते.

## खालापुरात मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत श्री छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय शेडुंग व भारतीय जनता पक्ष वडवल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी प्राथमिक शाळेत करण्यात आली. या वेळी शेकडो ग्रामस्थांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतली.

काही वेळा छोटे आजार आपल्या जीवावर बेतू शकतो. प्रत्येकाच्या घरची स्थिती उत्तमच आहे असे नाही. त्यामुळे भाजप जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे यांच्या संकल्पनेतून आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात सर्दी, ताप, खोकला, डेंग्यू, बीपी, शुगर, टाचांचे आजार, गुडघेदुखी, कंबरदुखी, ऑक्सिजन लेव्हल, त्वचा रोग, मासिक पाळी उपचार, वजन उंची आदी तपासणी करण्यात आली तसेच औषधेही देण्यात आली.

या वेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, ग्रामपंचायत सदस्य यशोदा मोरे, मानसी सकपाळ, अंकिता सकपाळ, भाग्यश्री सावंत, सदस्य जगदीश मरागजे, संजय कदम, अक्षय सकपाळ, रवींद्र मरागजे, सचिन मोरे, विकी मोरे, सागर मोरे, रवींद्र मरागजे, डी. डी. मरागजे, संदेश चाळके तसेच डॉ. प्रद्युमन भोसले, प्राची भोईर, संगीता जाधव, सदानंद शेडगे, मनोज बिरवाडकर, उर्मिला चव्हाण यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



## चांदेपट्टी ग्रामस्थांना घरगुती सामानाचे वाटप

### सामाजिक बांधिलकीतून मदत -भाजप नेते वैकुंठ पाटील



**पेण : प्रतिनिधी**

राज्यभरात मागील दोन ते तीन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू असून पेण तालुक्यातील चांदेपट्टी गावातील ३४ ग्रामस्थांना या ठिकाणी कोणताही धोका होऊ नये यासाठी गणपतीवाडी येथील मराठा समाज भवनात स्थलांतरित करण्यात आलेले आहे. या ग्रामस्थांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, शर्मिला पाटील व भाजप जिल्हा सरचिटणीस व प्रवक्ते मिलींद पाटील यांच्याकडून घरगुती सामान व फळ वटप करण्यात आले.

या ग्रामस्थांना त्यांच्या वस्तीत व्यवस्थित रस्ता नाही. मूलभूत गरजांपासुन नेहमीच वंचित राहावे लागत आहे. यापुढे आमदार रविशेठ पाटील याच्या माध्यमातून शासनाकडून कायमस्वरुपी जागा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करीत आहोत, असे या वेळी भाजप नेते वैकुंठ पाटील यांनी सांगितले.

चांदेपट्टी येथील ग्रामस्थांना संकटाला सामोरे जावे लागत आहे. या सर्व मंडळींना आपला सेवाभावी हातभार लागावा तसेच समाजात वावरताना समाजाचे काही तरी देणे आहे यांची जाणीव लक्षात घेऊन भाजप नेते वैकुंठ पाटील व मिलिंद पाटील यांच्या हस्ते घरगुती सामान देऊन ग्रामस्थांची विचारपूस करण्यात आली.

या वेळी भाजपचे वैकुंठ पाटील, शर्मिला पाटील, मिलिंद पाटील यांच्यासह महेश भिकावले, भरत जाधव, अजित साळवी, अंकुश कडू उपस्थित होते.

पान १ वरून

## राज्यात ठिकठिकाणी भाजपचे सेवाकार्य

कणकवली येथे आमदार नितेश राणे यांनी वैभववाडी पोलीस ठाण्यात सर्व पोलीस कर्मचाऱ्यांना रेनकोट वाटप केले. बार्शीटाकळी (जि. अकोला) येथे पूरग्रस्त गरजू परिवारांना आमदार हरिषभाऊ पिंपळे यांच्यातर्फे धान्य व आवश्यक सामुग्री किटचे वाटप करण्यात आले.

भाजप वैद्यकीय आघाडीतर्फे परतुर (जि. परभणी) येथील निवासी मूकबधिर विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून औषधी व पौष्टिक गोष्टींचे वाटप केले गेले. ज्यांना विविध प्रकारचे विकार आहेत त्यांच्या पुढील तपासणीसाठी नोंदणी करण्यात आली. डॉ. स्वप्नील मंत्री, डॉ. सुप्रिया मंत्री, डॉ. संजय पुरी, डॉ. सुधीर आंबेकर, डॉ. हरिप्रसाद ढेरे आदी या वेळी उपस्थित होते.

भाजप प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ यांनी पुण्यात दिव्यांग सहाय्यता अभियानाचे आयोजन केले होते. या अभियानाच्या माध्यमातून दोन हजार दिव्यांगांना सुसह्य उपकरणे, कृत्रिम अवयव नोंदणी आणि मोजमाप तसेच रोजगार नोंदणी शिबिर घेण्यात आले. नूमवि, अहिल्यादेवी हायस्कूल, वसंतदादा विद्यालय, रेणूका स्वरूप, गोळवलकर विद्यालय, गोपाळ हायस्कूल, ज्ञानसाधना विद्यामंदिर यांसारख्या विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे, हेमंत रासने, प्रमोद कोंढरे, हरिदास चरवड या वेळी उपस्थित होते.

## माणगाव ‘रोटरी’चा पदग्रहण सोहळा

**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक व शैक्षणिक कार्यात रायगड जिल्ह्यात नावलौकिक कमाविलेल्या रोटरी क्लब ऑफ माणगाव व रोटरी क्लब माणगाव चॅरिटेबल फाउंडेशनचा कार्यकारीणी वर्ष २०२३-२४ चा २७वा पदग्रहण समारंभ नियोजित प्रांतपाल (२०२४-२५) शितल शहा व सहाय्यक प्रांतपाल (२०२३-२४) सूर्यकांत महाडिक यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात झाला.



या समारंभात रोटरी क्लब ऑफ माणगाव नवनिर्वाचित अध्यक्ष बिपीन दोशी, सचिव निलेश मेथा, खजिनदार हेमंत शेट यांनी आपल्या पदाची सूत्रे स्वीकारली. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना नियोजित प्रांतपाल रोटे. शितल शहा यांनी रोटरी क्लब वाढविण्यासाठी रोटरीचे कार्य तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवा असे आवाहन केले.

रोटरी क्लब ऑफ माणगाव व रोटरी क्लब माणगाव चॅरिटेबल फाउंडेशनचा २७वा पदग्रहण समारंभ तसेच दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार रविवारी (दि. १६) नियोजित प्रांतपाल शितल शहा व सहाय्यक प्रांतपाल सूर्यकांत महाडिक यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता.

या समारंभास माणगाव नगरीचे माजी नगराध्यक्ष आनंद यादव, सामाजिक कार्यकर्ते संजयआण्णा साबळे, उपनगराध्यक्ष राजेश मेहता, माजी उपनगराध्यक्ष संदीप खरंगटे, नगरसेवक अजित तारळेकर, प्रदीप दोशी, प्रदीप गांधी, रोटरी क्लब माणगाव माजी अध्यक्ष संजोग शेट, कृउबा समिती माणगाव संचालक संतोष मेथा, रोटरीचे वरिष्ठ सदस्य डॉ. मदन निकम, डॉ. श्रीकांत वैद्य, हुसेन राहटविलकर, अमोल कुलकर्णी, नरेश राजपूत, रमेश जैन, विक्रांत सप्रे, दिनेश मेथा, सामाजिक कार्यकर्ते अल्ताफदादा धनसे, श्रद्धा इंग्लिश स्कूलच्या हेगडे मॅडम, वृत्तपत्र विक्रेते नितीन मेहता, निलेश चंद्रकांत मेथा, सचिन शरद देसाई, सिद्धांत देसाई, महाड-पेण तालुक्यासह जिल्ह्यातील रोटरी क्लबचे पदाधिकारी, माणगाव रोटरी पदाधिकारी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## देशातील सर्वाधिक पावसाची माथेरानमध्ये झाली नोंद

**नेरळ : प्रतिनिधी**

जगप्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानमध्ये रेकॉर्डब्रेक पावसाची नोंद झाली आहे. २४ तासांत देशातील सर्वाधिक अशा तब्बल ३९९ मिलिमीटर पावसाची नोंद करण्यात आली आहे. भारतीय हवामान विभाग अर्थात आयमडीने ट्वीट करून ही माहिती दिली.

सध्या महाराष्ट्रात मुसळधार पाऊस सुरू आहे. आयएमडीने दिलेल्या माहितीनुसार माथेरानमध्ये २० जुलै रोजी ४०० मिलिमीटर पाऊस झाला. मुंबई-पुण्याच्या हाकेच्या अंतरावर असलेले प्रसिद्ध हिलस्टेशन म्हणून माथेरानची ओळख आहे. पावसाळ्यात वीकेण्ड डेस्टिनेशन म्हणून प्रसिद्ध असलेल्या माथेरानमध्ये हजारो पर्यटक पावसाचा आनंद लुटण्यासाठी येत असतात.

**CITIZENS' HIGH SCHOOL AND JUNIOR COLLEGE**
**( Managed by Citizens' Education Society Uran.)**
INVITES TO APPLY FOR THE FOLLOWING PROFILES.

1. M.A B.ED.( ENGLISH)
2. H.SC D.ED
3. M.COM. B.ED ( ACCOUNTS)
4. LAB ATTENDANT
5. COMPUTER TEACHER
6. OFFICE ACCOUNTANT

Interested candidates may submit their resume with necessary documents in person by to the office of Citizens' high school and junior college.

Bazar peth ,near Uran police station.Dr. Ambekar road Uran.
Please email a copy to contact@mycitizen.in

## निवडक

### रोहिंजण येथे वायरचे बंडल चोरी

**पनवेल :** तालुक्यातील रोहिंजण येथे बांधकाम चालू असलेल्या एका इमारतीच्या फ्लॅटमध्ये ठेवलेले दीड लाख रुपये किंमतीची नवीन वायरींगने बंडलची चोरी अज्ञाताने केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पनवेल तालुक्यातील रोहिंजण गावात अधिराज कन्स्ट्रक्शन प्रा. लि. कंपनीचे बांधकाम चालू आहे आहे. या बांधकाम साईटवरील बिल्डींग नंबर २८ मधील बांधकाम चालू असलेल्या एका फ्लॅटमध्ये ठेवलेले दीड लाख रुपये किमतीचे पॉलीकंव कंपनीचे लाल, पिवळ्या निळ्या काळ्या रंगाचे नवीन वायरींगचे २० बंडल अज्ञात चोरट्याने चोरून नेले. याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. या घटनेचा अधिक तपास पोलीस हवालदार अजय मढवी करीत आहेत.

### नावडे फाटा येथून तरुणी बेपत्ता

**पनवेल :** नावडे फाटा येथून आपल्या राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक १८ वर्षीय तरुणी कोठेतरी निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. खुशबू हजांगीर शेख असे या तरुणीचे नाव असून तिची उंची पाच फुट पाच इंच, अंगाने मध्यम गोरा, डोळे काळे, केस लांब काळे, नाक सरळ असा वर्णन आहे. तिने अंगात काळा टॉप व लाल लेगीज घातलेली आहे. तसेच तिला मराठी, हिंदी भाषा बोलता येत असून या तरुणीबाबत कोणास काही माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाणे किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे (८३२९७७५६२७) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पनवेलमध्ये मालमत्ता कर दुरुस्ती मोहीम



## २४ ते २८ जुलैपर्यंत लाभ घेण्याचे आवाहन

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका मालमत्ता कर विभागामार्फत २४ ते २८ जुलै या कालावधीत आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सकाळी १०.३० ते १.३० या वेळेत कर निर्धारण दुरुस्ती मोहीम राबविण्यात येणार आहे. नागरिकांनी या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्वेक्षण पूर्ण झालेल्या मालमत्तांची कर आकारणी नोंदवहीची प्रारूप यादी स्थानिक वर्तमान पत्र, प्रभाग कार्यालय तसेच महापालिकेच्या panvelmc.org या संकेतस्थळावर ऑनलाईन प्रसिध्द करण्यात आलेली होती. तसेच वैयक्तिक नोटीस बजावून विहीत मुदतीत हरकत घेण्याची संधी मालमत्ता धारकाला देण्यात आली होती, परंतु काही मालमत्ता धारकांने दिलेल्या विहीत मुदतीत हरकत घेतलेली नाही. दिलेल्या मुदतीत हरकत न घेतलेल्या मालमत्ता धारकांना नैसर्गिक न्याय मिळावा या तत्वाने व महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ प्रकरण ८ अंतर्गत कराधान नियमानुसार कर आकारणीत दुरुस्ती,फेरफार करणेची तरतुद असल्याने मालमत्ता धारकांना हरकत अर्ज करण्यासाठीची आणखी एक संधी महापालिकेच्यावतीने देण्यात येत आहे.

यामध्ये मालमत्तेचे बाह्य स्वरूपाच्या मोजमापामध्ये काही त्रुटी राहिली असल्यास, वापरामधील तफावत असल्यास,स्वमालकी असताना भाडेतत्वावर झालेली कर आकारणी झाली असल्यास मालमत्ता धारकांनी हरकती अर्ज सादर करावेत. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत क्षेत्रातील मालमत्तांना कलम १२९अ नुसार कर आकारणी करण्यात येत आहे, मालमत्ताधारकास या संदर्भात काही हरकत असल्यासत्यांनी आपले हरकती अर्ज करावेत. तसेच पूर्णत्व प्रमाणपत्र, भोगवटाप्रमाणपत्र किंवा वापर दिनांकापासुन कर आकारणी, अनधिकृत शास्ती आकारणी बाबत, प्राथमिक कर आकारणी मध्ये नाव नोंद करणे, त्यामध्ये दुरुस्ती करणे याबाबात मालमत्ताधारकांच्या काही हरकती असल्यास त्यांनी आपला हरकत अर्ज पालिकेकडे करावा.

ग्रामपंचायतकालीन भरणा केलेल्या पावत्यांचे समायोजन करणे, कर निर्धारणामध्ये किरकोळ दुरूस्ती, प्रथम कर आकारणीमध्ये दुरुस्ती असेल, कर आकारणी न झालेल्या मालमत्तांना कर आकारणी बाबतीत मालमत्ताधारकांच्या काही तक्रारी असल्यास त्यांनी आपला हरकत अर्ज या मोहिमेंतर्गत सादर करावा. मालमत्ताधारक आजी,माजी सैनिक असल्यास मालमत्ता कराच्या बिलात सवलत द्यायची राहून गेली असल्यास त्यांनी या मोहिमेचा लाभ घ्यावा. मालमत्तताधारकांनी आपला आक्षेप अर्ज व आपल्या कागदपत्रासहित २४ ते २८ जुलैपर्यंत आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे सकाळी १०.३० ते १.३० या वेळेत सादर करावेत. या ठिकाणी मालमत्ता कर विशेष पुनः निरीक्षण मोहिमेंतर्गत खास चार पथकांचे नियोजन करण्यात आले आहे. या पथकातील कर्मचारी मालमत्ताधारकांची हरकत लक्षात घेऊन तत्काळ बिलामध्ये दुरूस्ती करून देतील.

### हरकतींचे निराकरण करा

*महापालिकेच्या सर्व प्रस्तावित कामांसाठी मालमत्ता कर हा प्रमुख स्त्रोत आहे. तसेच मा. न्यायालयानेही मालमत्ता कर, वसुलीला स्थगिती दिली नाही. त्यामुळे महापालिका मालमत्ता कराच्या वसुलीवर ती भर देत आहे. एप्रिल महिन्यापासून ते आजपर्यंत महापालिकेने १५० कोटीहून अधिक वसुली केली आहे. नागरिकांनी आपल्या मालमत्ता बिलासंर्भात असणाऱ्या हरकती या विशेष पुनःनिरीक्षण मोहिमेंतर्गत सादर करून त्यांचे निराकरण करावे, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.*

# सीकेटी महाविद्यालयात मोडीलिपी प्रशिक्षण कार्यशाळा

## इतिहास विभागातर्फे उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने १७ ते २२ जुलै २०२३ या कालावधीत मोडीलिपी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेसाठी प्रसिद्ध मोडीलिपी अभ्यासक महेश जोशी, (अध्यक्ष, वसुंधरा भाषा मोडीलिपी संवर्धन आणि संशोधन केंद्र, पुणे) हे प्रमुख प्रशिक्षक लाभले होते. या कार्यशाळेचा उद्घाटन समारंभ सोमवारी (दि. १७) झाला. या वेळी कला शाखा प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील उपस्थित होते. इतिहास विभाग प्रमुख डॉ. आर. डी. म्हात्रे यांनी प्रास्ताविक करून प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. इतिहास विभागाच्या ५६ विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला होता.

कार्यशाळेत महेश जोशी यांनी विद्यार्थ्यांना मोडीलिपी अध्ययनाचे आणि संशोधनाचे महत्त्व समजावून सांगून मोडीलिपीचे प्रारंभिक ज्ञान देऊन स्वतःचे नाव लिहिणे, मोडीलिपी लिप्यांतर, उतारा वाचन वनाममुद्रा बनविण्यास शिकविले. या कार्यशाळेचा समारोप समारंभ शनिवारी (दि. २२) झाला.

या कार्यशाळेसाठी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, आय.क्यू. एस. सी. समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन.वाजेकर यांनी मार्गदर्शन आणि शुभेच्छा दिल्या. कार्यशाळेचे आयोजन करण्यासाठी विभागप्रमुख डॉ. आर. डी. म्हात्रे आणि प्रा. भावेश भोईर यांनी परिश्रम घेतले.

# शाळा सुटीच्या उशिरा आदेशामुळे पालकांसह विद्यार्थ्यांची तारांबळ



**पनवेल : प्रतिनिधी**

रायगडमध्ये शाळा सकाळी असताना सुटीचे आदेश रात्री उशिरा सोशल मीडियावर मिळत असते, पण शाळेकडून अधिकृत माहिती मिळत नाही त्यामुळे पालकांच्यात संभ्रमाचे वातावरण निर्माण होत आहे. सकाळी विद्यार्थ्यांना पावसात शाळेत पाठवावे लागते त्यानंतर काही तासात विद्यार्थी घरी येतात. त्यामुळे अनेक पालकांनी प्रशासनाच्या कारभाराबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.

रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी जिल्ह्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांना शनिवार सुटी जाहीर केली. हवामान खात्याने अतिवृष्टीचा इशारा दिल्याने रायगड जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालये बंद ठेवण्याचा आदेश गेले तीन दिवस देण्यात येत आहेत.

पनवेल परिसरात अनेक शाळा सकाळी आहेत. सकाळी शाळा सुरू झाल्यावर किवा शाळा संपताना हे आदेश शाळा प्रशासनाला मिळत असल्याने शाळा सुरू रहाते. हे आदेश उशिरा येत असल्याने पालकांना भरपावसात मुलांना शाळेत पाठवावे लागत आहे.

ठाणे, पालघर, रत्नागिरी या जिल्ह्यात आधल्या दिवशी सुटी जाहीर केली जाते, पण रायगड जिल्ह्यात मात्र अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा जिल्हाधिकारी हे रात्री उशिरा आदेश काढत असल्याने संबंधित महापालिका व शाळांना ते दुसऱ्या दिवशी सकाळी १०नंतर मिळतात. त्यानंतर विद्यार्थ्यांना मध्येच परत पाठवायाचे तर पालक शाळेत येऊ शकत नाहीत. त्यामुळे गोंधळ निर्माण होत आहे. रायगडचे जिल्हाधिकारी हे इर्शाळगड वाडीच्या दुर्घटनाग्रस्त आदिवासी पाड्यावर बचाव व मदत कार्यात गुंतले आहेत. त्यामुळे आदेश उशिरा निघत असल्याचे सांगण्यात येते, पण अशावेळी पर्यायी व्यवस्था करणे गरजेचे असल्याचे पालकांचे म्हणणे आहे.

> **अशा सूचना विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना योग्य वेळी मिळतील याची खबरदारी सुद्धा शासनने घ्यायला हवी. बऱ्याचदा मुले शाळा कॉलेजला जाऊन घरी परततात आणि मग अशा सूचनांचा अर्थ उरत नसतो.**
> **-सलोनी सिंग**



पनवेल : भाजपच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल अविनाश कोळी यांचे अल्पसंख्यांक विभागाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. या वेळी अभिनंदन करताना अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश सचिव मन्सूर पटेल, उत्तर रायगड सरचिटणीस अ‍ॅड. इर्शाद शेख, उपाध्यक्ष नासिर शेख, पनवेल ग्रामीण अध्यक्ष मोमीन कर्नालकर, नवीन पनवेल उपाध्यक्ष मुदस्सर गोलंदाज, ज्येष्ठ नेते दस्तगीर सुभेदार व इतर पदाधिकारी. या वेळी भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे उपस्थित होते.



रसायनी : आमदार महेश बालदी यांच्या सूचनेने पीडब्ल्यूडीमार्फत दांडफाटा-रसायनी रोडचे खड्डे बुजवण्याचा काम युद्धपातळीवर चालू आहे. पाऊस चालू झाल्यापासून या रस्त्याला अनेक खड्डे पडले होते व या दोन दिवसांच्या अतिवृष्टीमुळे या खड्ड्यांच्या प्रमाणात वाढ झाली होती. आमदार महेश बालदी यांनी संबंधित डिपार्टमेंटला फोन करून खड्डे त्वरित बुजवण्याच्या सूचना केल्या होत्या. त्यानुसार या कामाला सुरुवात झाली आहे.

## किरकोळ वादातून एकाला मारहाण

**पनवेल :** किरकोळ वादात त्रिकुटाने एका व्यक्तीला मारहाण केल्याची घटना तळोजा फेज १ येथे घडली आहे.

सुरेशचंद्र गुजर (वय ३५) हे त्यांच्या तळोजा फेज २, सेक्टर २२ मधील हार्डवेअरच्या दुकानात बसले असताना आरोपी अल्ताफ, त्याचा भाऊ व एका अनोळखी व्यक्तीने सुरेशचंद्र यांना किरकोळ वादातून धमकी दिली, मात्र सुरेशचंद्र यांनी दुर्लक्ष केल्याने आरोपींनी त्यांना छत्री व छोट्या लोखंडी पाईपने व हाताचापटीने मारहाण केली. यामध्ये सुरेशचंद्र गुजर यांच्या डोक्यावर व भुवईवर दुखापत झाली आहे. घटनेची नोंद तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली असून तपास सुरू आहे.

# एमपीएससी, यूपीएससी परीक्षेच्या तयारीचे मार्गदर्शन





### सीकेटी महाविद्यालयात अतिथी व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

एमपीएससी आणि यूपीएससी परीक्षेची तयारी कशी करावी? या विषयावर जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील सीकेटी स्वायत्त महाविद्यालयात सी.डी. देशमुख स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे शुक्रवारी अतिथी व्याख्यान झाले.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून ठाणे महापालिकेचे माजी उपायुक्त आणि सी.डी. देशमुख इन्स्टिट्यूट ठाणेचे संचालक महादेव जगताप व सी. डी. देशमुख इन्स्टिट्यूट ठाणेचे समन्वयक गिरीश झेंडे यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. या वेळी सी. डी. देशमुख स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे अध्यक्ष डॉ. जे. एम. पावरा, सी.डी.देशमुख केंद्राचे समन्वयक विजयेंद्र शितोळे, अर्थशास्त्र विभागाचे प्रा. हरिभाऊ खरात, इतिहास विभागाचे प्रा. भावेश भोईर व सी.डी.देशमुख केंद्राच्या लिपिक मनाली परब यांची उपस्थिती लाभली.

महादेव जगताप यांनी आपल्या व्याख्यानामध्ये पदवी काळात स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करायला हवी, अभ्यासाप्रती मुलांचा दृष्टिकोन कसा असावा, एमपीएससी, यूपीएससी परीक्षांचे स्वरूप, पात्रता, टप्पे त्याचप्रमाणे अभ्यासाची पद्धत विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. तर गिरीश झेंडे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरक असे व्याख्यान केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. आर. व्ही. येवले आणि आभार प्रदर्शन सी.डी. देशमुख केंद्राचे समन्वयक विजयेंद्र शितोळे यांनी केले.

# इर्शाळवाडीत बचावकार्य करणाऱ्यांना नाश्ता



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघ पनवेल येथील मंडळाचे सदस्यांनी शुक्रवारी (दि. २१) व शनिवारी (दि. २) दुर्घटनाग्रस्त इर्शाळवाडीत कार्य करणाऱ्या एनडीआरएफ व अन्य टीम थकून परतत असताना चहा बिस्कीट सेवा दिली.

जवळपास १००० च्यावर सपोर्टींग टीमला चहा आणि बिस्कीट देण्यात आले. सतत पावसात भिजलेल्या लोकांना हा चहा मिळाल्यामुळे त्यांना थोडा थकवा दूर करण्यासाठी आधार झाला. पोलीस आणि वाडीवरून खाली उतरणाऱ्या टीम्सनी मंडळाचे कौतुक करून आभार मानले.

या कार्यात अध्यक्ष केशव राणे, उपाध्यक्ष प्रिया खोबरेकर, स्वप्नाली देसाई, अर्चना तावडे, सई राणे, आरती सावंत, स्वप्ना राणे, बाबाजी नेरूरकर, गुरूदास वाघाटे, प्रदीप रावले, सूर्यकांत देसाई, रंगनाथ नेरूरकर, सौरभ राणे, प्रतीक भोजने, संतोष नेरूरकर, यश मोचेमाडकर, अशोक चव्हाण, जया परब, संकेत पवार, अनिकेत पालव यांनी सहभाग घेतला.

# 'इनरव्हिल'ची नवीन कार्यकारिणी जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनरव्हिल क्लब ऑफ पनवेल सिटी यांचा नुतन अध्यक्ष निवडीचा समारंभ खांदा कॉलन रोटरी कम्युनिटी हॉल येथे गुरुवारी (दि. २०) झाला.

समारंभाची सुरुवात एका चांगल्या उपक्रमाद्वारे करण्यात आली. यामध्ये आई डे केअर संस्था (ता. पेण)मधील तीन गतिमंद मुलांचे एका वर्षाकरिता पालकत्व घेण्याचे क्लबन मंजूर केले आणि त्याकरिता ४३ हजार २०० रुपये देण्यात आले.

समारंभात सन २०२३-२४करिता ध्वनी तन्ना यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. याशिवाय सेक्रेटरीपदी स्नेहल कल्याणकर, उपाध्यक्षपदी जयश्री मंगलानी, खजिनदारपदी वैशाली कटारिया, आयएसओपदी बिजल मिरानी, एडिटरपदी विजयता कोठारी, क्लब बातमीदार म्हणून मौसमी यांची निवड करण्यात आली.

या समारंभाच्या प्रमुख पाहुण्या इनरव्हिल डिस्ट्रिक्ट ३१३च्या व्हाईस चेअरमन डॉ. शोभना पालेकर आणि माजी इनरव्हिल डिस्ट्रिक्ट ३१३च्या चेअरमन संतोष सिंह यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. कलाश्रुता ॲकॅडमीच्या राधिका रंगपरिया यांनी गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात केली. मावळत्या अध्यक्ष हेतल बालड यांनी वर्षभर केलेल्या सहकार्याबद्दल सदस्यांचे आभार मानले. सेक्रेटरी गिरा चैहान यांनी क्लबने वर्शभरात केलेल्या विविध प्रकल्पांची माहिति सांगितली.

प्रमुख पाहुणे शोभना पालेकर यांनी क्लबने केलेल्या कार्याचे कौतुक करीत क्लबला मोलाचे मार्गदर्शन केले तसेच पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

नवीन अध्यक्ष ध्वनी तन्ना यांनी पुढील वर्षाच्या प्रकल्पाची माहिती दिली तसेच या वर्षी त्यांनी क्लबमध्ये नवीन १५ सदस्य जोडले. उपाध्यक्ष जयश्री मंगलानी यांनी आभार मानून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.



## विद्युत विभागाच्या तत्परतेमुळे मुलाला मिळाले जीवदान

**पनवेल : वार्ताहर**

पावसाच्या पाण्यात विजेचा झटका बसून बेशुद्ध अवस्थेत पडलेल्या पंधरा वर्षांच्या मुलाला पनवेल महापालिकेच्या विद्युत विभागाच्या तत्परतेमुळे जीवदान मिळाले आहे. पनवेल शहर परिसरात ही घटना घडली आहे.

मंथन तारे (वय १५) असे या मुलाचे नाव असून महावितरणची ओव्हरहेड वायर रस्त्यावर पडून तिचा विद्युत प्रवाह पाण्यात उतरल्याने या ठिकाणाहून जाणाऱ्या मंथनला या विजेचा जोरदार झटका बसला. यात तो बेशुद्ध पडला, नागरिकांनी पालिकेच्या विद्युत विभागाला ही बाब सांगितली. या वेळी तत्काळ अग्निशमनचे कर्मचारी, विद्युत विभागाचे अधिकारी प्रीतम पाटील, इलेक्ट्रिशियन नितीन गायकवाड यांनी घटनास्थळी धाव घेतली. गायकवाड यांनी ओव्हरहेड बाहेर बाजूला केली. त्यानंतर प्रीतम पाटील यांनी पालिकेच्या ॲम्बुलन्समधून उपजिल्हा रुग्णालय गाठत मंथनला रुग्णालयात दाखल केले.

घटनेची माहिती मिळताच उपायुक्त सचिन पवार हेदेखील उपजिल्हा रुग्णालयात पोहचले. प्राथमिक उपचार केल्यानंतर मंथनला उपजिल्हा रुग्णालयातून हलवून एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले. तत्काळ मदत मिळाल्याने मंथनचे प्राण वाचले आहेत.

# नागभूषण देवेंद्र फडणवीस

**गिरीश गांधी,**
विश्वस्त, वनराई

**समाजाची नेमकी गरज काय आहे ते ओळखून, देवेंद्रजींनी महत्त्वपूर्ण प्रकल्प राबवले व पूर्ण केले आहेत. लहानपणापासूनच समाजाकडे लक्ष देण्याची त्यांची सवय त्यांना आगळे द्रष्टेपण देवून गेली आहे. म्हणूनच राजकीय क्षेत्रात पावलोपावली त्यांचा नावलौकिक वाढत राहिला आहे.**



स्वतंत्र भारताच्या पंधराव्या राष्ट्रपती महामहिम श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या शथविधी सोहळ्यात अगदी पहिल्या रांगेत स्थानापन्न होण्याचा सन्मान महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्राप्त झालेला बघून मला फार अभिमान वाटला. नागपूरचा सुपूत्र भारताच्या राजकीय जीवनात दैदीप्यमान यश संपादन करून या स्थानावर विराजमान झाला ही खचित आनंदाची बाब आहे.

देवेंद्र गंगाधरराव फडणवीस यांना मी त्यांचे राजकीय जीवन सुरू होण्याच्या आधीपासून ओळखतो. त्यांचे वडील स्व. गंगाधरराव फडणवीस हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आणि जनसंघाचे निष्ठावंत कार्यकर्ता होते आणि विधान परिषदेचे सदस्यही होते आणि नागपुरातली अत्यंत प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून सर्वपरिचित होते. त्यामुळे त्यांच्याशी माझा चांगला परिचय होता. त्यांच्या कार्याचा मला अनुभव होता. त्याकाळी राजकारणातली मंडळी पक्षनिरपेक्ष परस्परांशी चांगले सौजन्यपूर्ण संबंध जोपासत असत. त्यामुळे मी गंगाधररावांच्या कुटुंबाशी जोडलेला होतो. देवेंद्र यांना 'राजकारण' वारसा हक्काने मिळाले मात्र त्यांनी स्वत:ची कारकीर्द स्वतंत्रपणे, स्वबळावर निर्माण केली. अभ्यास, व्यासंग, वैचारिक बैठक, सखोल राजकीय व न्यायिक ज्ञान यामुळे त्यांची कारकीर्द यशस्वी सिद्ध झाली.

महाविद्यालयीन जीवनापासून अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे ते सक्रिय नेते, सदस्य होते. विशेष गुणवत्तेसह त्यांनी लॉ. ची पदवी प्राप्त केली. त्यानंतर व्यवस्थापन शास्त्राची पदवीही त्यांनी प्राप्त केली. जर्मनीतील d.s.e बर्लिन या संस्थेतून diploma in methods and techniques of project management हा डिप्लोमा त्यांनी मिळवला. असे उच्च शिक्षण, सुसंस्कृत आणि सभ्य-शालीन व्यक्तित्व घेऊन राजकारण व न्यायिक शाखांचा अभ्यास करून ते सक्रिय राजकारणात प्रवेशते झाले. नागपूर महापालिकेचे सलग दोनदा महापौरपद भूषविणारे भारतातील आजवरचे दुसरे सर्वांत तरुण महापौर अशी त्यांची ख्याती आहे. तसेच महाराष्ट्रातून 'मेअर इन काऊंसिल'चा मान मिळविणारे ते पहिलेच महापौर होत. एक अनुभवी लोकप्रतिनिधी आणि त्यांच्या राजकीय वाक्यचातुर्यासाठी ते लोकप्रिय आहेत. आजवर सलग पाच वेळा महाराष्ट्र विधान सभेचे सदस्य असण्याचा मान त्यांनी पटकावला आहे. २०१४ ते २०१९ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. वयाच्या ४४व्या वर्षी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणारे ते दुसरे मुख्यमंत्री होते.

एखाद्याचे पाय पाळण्यात दिसतात असं म्हणतात. देवेंद्र सहा वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांना आणीबाणीत अटक झाली होती. लहान वयात त्यांनी आईला बजाउन सांगितले 'माझ्या बाबांना इंदिरा गांधींनी अटक केली म्हणून मी इंदिरा कॉन्व्हेंटमध्ये शिकणार नाही.' त्यांचं पुढील शिक्षण सरस्वती विद्यालयात झालं. रा. संघ, जनसंघाचे, जनसेवेचे सभ्यता-सौजन्याचे बाळकडू घेऊन देवेंद्र यांनी नव्वदच्या दशकात आपल्या राजकीय कारकिर्दीची दमदार सुरुवात केली आणि अत्यंत अल्पावधीतच जनमानसातील एक तरुण, तडफदार, उमदा नेता म्हणून ते लौकिक प्राप्त झाले. ते १७ वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचे कर्करोगाने निधन झाले. वडिलांच्या उपचारा दरम्यान त्यांनी आपल्या वडिलांच्या वेदना बघितल्या. नागपूरबाहेर आपल्या वडिलांना उपचारासाठी न्यावे लागले याची खंत त्यांना तेव्हाच जाणवली होती. काही वर्षांनी त्यांचे मित्र श्री. शैलेश जोगळेकर यांच्या पत्नीचाही कर्करोगाने मृत्यू झाला. दोघांनाही ती खंत जाणवली की, आपल्या गावात कर्करोगाच्या उपचारासाठी आधुनिक अद्ययावत हॉस्पिटल नाही. २५ वर्षांपूर्वी त्यांनी संकल्प केला आणि संधी मिळताच नागपुरात अद्ययावत आणि मोठी अशी नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट ही संस्था स्थापन केली. नागपूर, विदर्भ आणि मध्य प्रदेशातील कर्करोगींसाठी ते वरदान ठरले आहे.

समाजाची गरज ओळखून, समाजहिताचे नवनवे प्रकल्प हाती घेऊन ते पूर्णत्वास नेणे ही तर त्यांची हातोटी मानली जाते. लहान वयापासून समाजाकडे लक्ष देण्याची त्यांची सवय अप्रत्यक्षपणे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एक आगळेच द्रष्टेपण (vision) प्रदान करून गेली. दूरदृष्टी असलेला नेता म्हणून त्यांचा लौकीक वाढत राहिला.

राजकारणासोबतच त्यांना 'वक्तृत्व' ही कला सुद्धा वारसाहक्कात मिळाली आहे. कर्तृव, नेतृत्व आणि वक्तृव या तीनही गुणांमुळे देवेंद्र यांचं व्यक्तिमत्व अत्यंत प्रभावी बनलं आहे. राष्ट्रीय आंतर विद्यापीठ वादविवाद स्पर्धेत सर्वोत्कृष्ट वक्ता म्हणून त्यांनी पुरस्कार पटकविला आहे. पुण्याच्या मुक्तछंद संस्थेतर्फे स्व. प्रमोद महाजन यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ देण्यात येणारा पहिला सर्वोत्कृष्ट संसदपटू हा पुरस्कार आणि सर्वांत महत्त्वाचा म्हणजे कॉमनवेल्थ पार्लमेंटेरियन असोसिएशन तर्फे सर्वोत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे. तद्वतच कुठलंही व्यासपीठ असो त्यांच्या व्याख्यानाचा, भाष्याचा, वक्तव्याचा अमीट प्रभाव ऐकणाऱ्यांवर राहतो, हेच त्यांच्या बोलण्याचे यश आहे. बोलण्यात जसा आत्मविश्वास जाणवतो तेवढाच त्यांच्या स्वभावातून त्यांच्या स्वत:वरचा, स्वत:च्या ज्ञानावरचा आणि वैचारिक भूमिकेवरचा आत्मविश्वास प्रतीत होत असतो. यांच्या शब्दाला, वक्तव्याला म्हणूनच फार महत्त्व प्राप्त आहे.

आपण समाजाचे सेवक आहोत ही वस्तुस्थिती ते कधीच विसरत नाहीत. लोकांसाठी, लोकांसोबत सतत उपयुक्त प्रकल्प राबविण्यासाठी ते तत्पर असतात. कायद्याचं ज्ञान त्यांना आहेच. त्यामुळे एखादी गोष्ट कायद्यात बसत नसेल आणि लोकोपयोगी आहे म्हणून ती करायचीच असेल तर ती गोष्ट कायद्यात कशी बसेल यासाठी ते प्रामाणिकपणे प्रयत्न करतात आणि यशस्वी होतात हा सामाजिक प्रत्यय आहे.

मेयर इन काऊंसिलमध्ये सभागृह चालवताना ते पक्ष आणि विरोधी पक्षातील सर्वांनाच बोलण्याची, आपले मत मांडण्याची संधी देत. म्हणजे अंतिम निर्णयाआधी काही चुका लक्षात आल्या तर त्या दुरुस्त करण्याची संधी राहते व अचूक निर्णय घेता येतो ही त्यांची कार्यपद्धती माध्यमांद्वारे प्रसिद्ध झाली आणि ती प्रशंसनीय ठरली आहे.

राजकीय व्यक्तीकडून विधायक व मूलभूत कार्याची समाजाची अपेक्षा असते. राजकारणापासून दूर असणाऱ्या ज्येष्ठ आणि नव्या पिढीच्या नागरिकांचे समाधान करणे आणि मूलभूत मानवी सद्गुणांची जोपासना प्रामाणिकपणे करण्यासाठी कार्यशील राहणे या किमान अपेक्षा समाजाच्या राजकारण्यांकडून असतात. त्यासाठी नेत्यांना डोळस असावे लागते. संघटनकौशल्य, समर्पण आणि भेदभावविरहित कार्यपद्धतीचा अवलंब महत्त्वाचा ठरतो आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे अतिशय चोख न्यायबुद्धी असावी लागते. देवेंद्र फडणवीस यांच्या व्यक्तिमत्त्वात या सर्व गुणांचा समन्वय मोठ्या साक्षेपाने जाणवतो आणि या गुणवैशिष्ट्यांमुळे ते यशस्वी नेते म्हणून ख्यातीप्राप्त आहेत.

एक परिपूर्ण राजकारणी (perfect politician) असं त्यांचं वर्णन करता येतं. त्यांच्या मनातली खळबळ त्यांच्या चेहऱ्यावर कधीच प्रतिबिंबित होत नाही. त्यांच्या मौनाचा थांग कधी लागत नाही. कायम चेहऱ्यावर प्रसन्न हास्य विलसत असतं आणि एक सकारात्मकता, आश्वासकता जाणवत असते. कोणत्याही घटनेवर, प्रसंगावर ते भावनिक प्रतिक्रिया देत नाहीत. कधीही जजमेंटल झालेले दिसत नाहीत. वाहती नदी जशी खूप खोल ठिकाणी निश्चल आणि तरंगहीन संथ वाहते तसं देवेंद्र यांचं व्यक्तित्व धीर गंभीर आणि गहन वाटतं. त्यांचा अभ्यास-वकीलीचा व्यासंग आणि विचार यामुळे वेगळाच आत्मविश्वास त्यांच्या वागण्या-बोलण्यातून प्रकटतो मात्र त्यांचं अर्थपूर्ण हास्य ही त्यांची खुबी मानली जाते.

देवेंद्र यांच्या पाठीशी त्यांच्या वडिलांची आणि काकूंची पुण्याई तर आहेच किंबहुना महाराष्ट्राच्या जनमानसाचे मन:पूर्वक आशीर्वाद आणि जनाधार आहेच. मराठा आरक्षणच्या धाडसी निर्णयामुळे जात-पात-धर्म-पक्ष-पंथ निरपेक्ष कार्य करणारे ते प्रामाणिक लोकनेते आहेत याची ग्वाही महाराष्ट्राला मिळाली आहे. त्यांच्या याच लोकहितवादी, सामाजिक कल्याणकारी कार्याचा गौरव करण्यासाठी नागभूषण फाऊंडेशनने 'नागभूषण' पुरस्कार प्रदान करून त्यांना सन्मानित केले आहे. नागपूरकरांचा सार्थ अभिमान असलेल्या या लोकनेत्याला राजकारणात सदैव भरघोस यश मिळो, ही माझी सद्भावना व शुभकामना आहे.

# त्यागी, संयमी, विनयशील व मुत्सद्दी नेतृत्व

(पान १ वरून)

देवेंद्रजी यांना अनेक वेळा टोकाच्या टीकेला सामोरे जावे लागले, अनेक वेळा त्यांना टोमणे मारले गेले. मला आठवते, विधानमंडळाच्या सेंट्रल हॉलमध्ये त्यांनी लिहिलेल्या बजेटच्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ होता. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री म्हणून भाषणात असे म्हणाले होते की, 'देवेंद्रजी फडणवीस सरकारी पैशातून कार्यक्रम करतात.' मला हा टोमणा जिव्हारी लागला होता. पण अशा टीकाटिप्पणीने विचलित होणाऱ्यातले देवेंदजी नाहीत, हे अनेक उदाहरणातून आपण पाहिले आहे. निवडणुकीतील 'मी पुन्हा येईन' या वाक्यावर वेगवेगळ्या पद्धतीने टीका झाली, परंतु टीकेला टीकेने उत्तर देण्याऐवजी त्यांनी आपल्या कामातून उत्तर दिले आणि सरकार आणून दाखवले. देवेंद्रजी पुन्हा तर आलेच पण सगळ्यांना भुईसपाट करून आले.

महाराष्ट्राने देवेंद्रजी यांचा मुख्यमंत्रीपदाचा कार्यकाळही पाहिला आहे. आदरणीय कै. यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर महाराष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने सर्वाधिक लक्षवेधी काळ कोणता असेल तर तो देवेंद्रजी फडणवीस यांच्या मुख्यमंत्रीपदाचा काळ आहे, असे म्हणण्यास मी मागे पुढे पाहणार नाही. ज्या जलद गतीने केवळ साडेचार वर्षांच्या काळात त्यांनी महाराष्ट्रात अनेक विकासाभिमुख प्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवली, त्यांची सुरुवात केली, पूर्णत्वास नेले, याची नोंद इतिहासात झाली आहे. देवेंद्रजी यांच्याकडे विकासाचे व्हिजन आहे. मुंबई, पुणे, नागपूरला मेट्रो, बुलेट ट्रेन, समृद्धी महामार्ग, स्मार्ट सिटी, मराठवाड्याला सुजलाम सुफलाम करू शकणारा मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्प, दुष्काळ नाहीसा होण्यासाठी कोकणातील समुद्रात वाहून जाणारे पाणी वळविण्याचा प्रकल्प, शाश्वत शेतीसाठी जलयुक्त शिवार, अशा अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची मुहूर्तमेढ त्यांनी महाराष्ट्रात रोवली. मोठे प्रकल्प असो किंवा छोटी कामे, तेवढेच गांभीर्य ते त्या कामात दाखवतात, हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील एक वेगळा पैलू आहे. ६०० पोलीस उपनिरीक्षकांना नियुक्ती देण्याचा विषय अनेक वर्षं प्रलंबित होता. थोडा किचकट प्रश्न असतानाही त्यांनी त्यातून मार्ग काढला आणि या ६०० पोलीस उपनिरीक्षकांना नियुक्त्या दिल्या.

आपण नेहमी पाहतो की, एखाद्या सोसायटीच्या अध्यक्षाला आपलं पद सोडावसं वाटत नाही. सत्ता परिवर्तनानंतर नेतृत्वाने घेतलेला माननीय श्री. एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद देण्याचा निर्णय देवेंद्रजी यांनी जाहीर केला आणि सत्तेबाहेर राहून सरकारच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेतला; परंतु ज्यावेळी वरिष्ठांकडून आदेश आले त्यावेळी शिस्तबद्ध स्वयंसेवक कसा असतो हे त्यांनी दाखवून दिले. मोदीसाहेब त्यांना म्हणाले होते की, 'देवेंद्र, नेते म्हणून तुमची द्विधा मनःस्थिती मी समजू शकतो, पण राज्याच्या भल्यासाठी तुम्हाला जबाबदारी घ्यावी लागेल, तुम्हाला सत्तेत राहावे लागेल.' पक्षादेश शिरसावंद्य मानून मुख्यमंत्रीपद आनंदाने दुसऱ्याला देऊन विचारधारेचा विजय त्यांनी घडवून आणला. त्यांचा हा त्याग आणि संयम या वेळी संपूर्ण देशाने पाहिला. त्यानंतरची कार्यकर्त्यांची हळहळ त्यांच्यावरील निस्सिम प्रेमाची साक्ष देणारी होती, हेही देशाने पाहिले.


देवेंद्रजी हे खऱ्या अर्थाने बहुजनांचे नेते आहेत. 'बहुजन सुखाय, बहुजन हिताय', याचा प्रत्यय त्यांनी आपल्या कामातून दाखवून दिला. ओबीसी आरक्षण गेल्या अडीच वर्षांत वाचवता आले नव्हते. नव्याने सरकार स्थापन झाल्यानंतर देवेंद्रजी यांनी मंत्रालयात पहिली बैठक जर कोणती घेतली असेल तर ती ओबीसी आरक्षणासंदर्भात घेतली होती. वकिलांशी, अधिकाऱ्यांशी चर्चा केली, कशा पद्धतीने न्यायालयात बाजू मांडली पाहिजे, याची रणनीती ठरवली आणि ओबीसी आरक्षण वाचवण्यात ते यशस्वी ठरले. ते मुख्यमंत्री असताना धनगर आरक्षणाबाबतचा अभ्यास करण्यासाठी टीस या प्रतिष्ठित संस्थेची त्यांनी नेमणूक केली होती, अहवाल आलाही, परंतु त्यांचे सरकार त्यानंतर गेले आणि हा विषय मागे पडला. ते मुख्यमंत्री असताना मराठा आरक्षणाचा प्रश्न अतिशय गंभीर बनला होता. त्यावेळी त्यांनी मराठा समाजाला विश्वास दिला, कोणतीही घिसाडघाई न करता, आरक्षणासाठी हजारो पुरावे गोळा केले, आयोगाचा अहवाल घेतला, अतिशय मजबूत कायदा तयार केला आणि मराठा समाजाला आरक्षण दिले. एव्हढेच नाही तर उच्च न्यायालयापर्यंत ते टिकवले; परंतु सत्ता बदल झाल्यानंतर मराठा आरक्षण टिकवून ठेवण्यात नंतरचे सरकार अपयशी ठरले. आजही या प्रश्नांबाबत ते संवेदनशील आहेत आणि हाही प्रश्न ते धसास लावतील, हा विश्वास मराठा समाजाला आहे.

राजकारणात राहून सुसंस्कृतपणा जपणं अत्यंत अवघड काम असतं. नागपूर महापालिकेच्या नगरसेवक पदापासून ते मुख्यमंत्री पदापर्यंत आणि विधानसभेच्या आमदारांपासून ते विरोधी पक्षनेतापर्यंत अनेक पदं त्यांनी भूषविली. महाविकास आघाडीच्या सत्ता काळात त्यांनी सत्तारूढ पक्षाला हलवून सोडले होते. त्यामुळे देवेंद्रजी कुठे अडचणीत येऊ शकतील, यासाठी अनेकांनी जंग जंग पछाडले, परंतु एकही डाग त्यांच्यावर लागला नाही. मला वाटतं, हीच त्यांच्या प्रामाणिक आणि पारदर्शक कामांची पावती आहे.

संकटकाळात आपल्या सहकाऱ्यांना साथ देणारा आणि त्यांच्या पाठीशी उभा राहणारा नेता मी त्यांच्यात नेहमी बघितला. मी विधान परिषदेचा विरोधी पक्षनेता असताना माझ्यावर खोटेनाटे आरोप केले गेले, माझ्यावर खोटे गुन्हे दाखल करण्यात आले. या संकटाच्या काळात देवेंद्रजी सतत माझ्या पाठीशी होते, धिरोदात्तपणे या संकटाला सामोरे जाण्याचे बळ त्यांनी मला या काळात दिले.

देवेंद्रजी एक उत्तम प्रशासक आहेत, हे सर्वच सांगतात. सत्तेत असताना साईड पोस्टिंग दिलेल्या चांगल्या अधिकाऱ्यांना त्यांनी कार्यकारी पदांवर आणले, त्यांना विश्वास दिला, काम करण्याची संधी दिली आणि खूषमस्कऱ्या अधिकाऱ्यांना बाजूला सारले, प्रशासनाचा चेहरामोहरा बदलून पाच वर्षांच्या काळात प्रशासन जनताभिमुख केले.

अलीकडचाच एक प्रसंग मला आठवतो. सत्तापरिवर्तन झाल्यानंतर सागर बंगल्यावर कार्यकर्ते, नेते, पदाधिकारी यांची प्रचंड गर्दी जमली होती. देवेंद्रजी यांचा स्टाफ आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांना ही गर्दी आवरणे मुश्कील झाले होते. गर्दी थांबवावी



का, अशा प्रकारची विचारणा देवेंद्रजींकडे केली तेव्हा ही गर्दी, ही जनता, हे कार्यकर्तेच आपलं खरं सामर्थ्य आहे, त्यामुळे सगळ्यांना भेटू, कुणालाही अडवू नका, अशी सूचना त्यांनी दिली. असा हा माणसातील नेता आहे.

देवेंद्रजींच्या कामकाजाची पद्धत मी अनेक वेळा जवळून बघितली आहे. एकाच वेळी अनेक कामे अतिशय लीलया ते पार पाडत असतात. एका बाजूला कार्यकर्त्यांना भेटत असतात, त्यांच्याबरोबर फोटो काढत असतात, त्याचवेळी दुसऱ्या हॉलमध्ये जाऊन प्रशासकीय अधिकाऱ्यांबरोबर बैठका घेत असतात. नेते, कार्यकर्ते यांच्याशी राजकीय चर्चा करीत असतात, दुसऱ्या बाजूला वकिलांशी कायदेशीर चर्चाही करीत असतात. मल्टी टास्किंगचे उत्तम स्किल त्यांच्यात असल्याने ते प्रत्येक विषयाला वेळ आणि न्याय देऊ शकतात. शारीरिक कष्टाची पर्वा न करता आणि प्रकृतीचे अवास्तव स्तोम न माजवता नागपूर, दिल्ली, मुंबई, गोवा, महाराष्ट्रातला गावोगाव ते सहज फिरत असतात. हा दौऱ्यांचा त्यांचा झपाटा आश्चर्यचकित करणारा आहे. प्रशासकीय कामकाज असो वा पक्षीय कामकाज प्रत्येक कामात पंक्चुअल राहण्याचा त्यांचा आग्रह असतो. विधान परिषदेचा विरोधी पक्षनेता असल्यामुळे देवेंद्रजी यांच्याबरोबर अनेक दौरे करण्याचा योग मला आला. त्या प्रत्येक वेळी त्यांच्याकडून काही ना काही शिकण्यासारखे होते. राज्यभरात फिरत असताना ते नेहमी आपल्याबरोबर असणाऱ्यांची काळजी घेत, कोणत्याही पक्षाचा कार्यकर्ता भेटायला आला तर शक्य होईल तेव्हढे समाधान करीत. त्यामुळेच विरोधकांना हा नेता आपला वाटतो.

नेतृत्वावर अपार श्रद्धा ठेवणारा आणि नेतृत्वाचे आदेश शिरसावंद्य मानणारा हा शिस्तबद्ध नेता आहे. हिंदुत्व आणि विकास या दोन गोष्टीत त्यांनी कधी तडजोड केल्याचे एकही उदाहरण सापडणार नाही.

कार्यकर्त्याला बळ कसे दिले पाहिजे, हे देवेंद्रजी यांच्याकडून शिकण्यासारखे आहे. मुंबई बँकेचा अध्यक्ष असताना स्वयं पुनर्विकासासाठी पतपुरवठा करणारी योजना मी आणली होती. या योजनेला राजाश्रय देण्याचे काम त्यांनी मुख्यमंत्रीपदी असताना केले. नंतरच्या काळात या योजनेला खिळ बसली. पत्रव्यवहार किंवा फोनाफोनी न करता मला ते आरबीआयचे गव्हर्नर श्री. शक्तीकांत दास यांच्याकडे घेऊन गेले, त्यांना अर्धा तास ही योजना आणि त्याची गरज त्यांनी समजावून सांगितली, एव्हढ्यावर न थांबता, मला घेऊन केंद्रीय अर्थमंत्री मा. श्रीमती निर्मला सीतारामन यांची भेट घेतली. मला सांगण्यास अभिमान वाटतो की, केवळ आणि केवळ त्यांच्याच प्रयत्नामुळे आज आरबीआयने या योजनेला मान्यता दिली.

लीडरशिप कॅलिटीबाबत असे म्हटले जाते की, 'लीडर शुड बी गुड लिसनर', छोट्यातला छोटा कार्यकर्ता असो किंवा मोठा नेता, विरोधी बाकावरील सदस्य असो किंवा शासकीय अधिकारी प्रत्येकाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे आणि त्यानंतरच त्यावर मतप्रदर्शन करणे हा त्यांच्या कार्यशैलीचा एक भाग आहे.

आपला सन्मान व्हावा, जंगी स्वागत व्हावं, असं अनेक नेत्यांना वाटत असतं. कधी कधी याचा त्रास जनतेला होतो. पण आपल्यामुळे कुणालाही त्रास होणार नाही याची दक्षता देवेंद्रजी नेहमी घेतात, हे अनेक प्रसंगातून मी अनुभवले आहे. गणपती दर्शनासाठी माझ्याकडे ते एकदा आले होते. व्यस्ततेमुळे उशिरा रात्री त्यांना वेळ मिळाला, ते आल्यानंतर उत्साही कार्यकर्त्यांनी त्यांच्या स्वागतासाठी फटाक्यांची माळ लावली. लोकं झोपलेली असतात, फटाक्यांच्या आवाजामुळे त्यांना त्रास होता कामा नये, असे म्हणून त्यांनी कार्यकर्त्यांना थांबविले. असेच एकदा सकाळी तीन-चार वाजता बोरिवली येथे मेट्रो प्रकल्पाची पाहणी करण्यासाठी ते आले. दिवसा भेट दिली तर ट्रैफिकमुळे जनतेला त्रास होईल म्हणून सकाळची तीन-चार वाजताची वेळ निवडणारे देवेंद्रजी विरळाच.

वेळप्रसंगी त्यांनी विरोधकांना हेही दाखवून दिले की, 'उगा नाद करायचा नाही.' अलीकडेच झालेली राज्यसभेची निवडणूक असेल किंवा विधान परिषदेची निवडणूक असेल, 'अकेला देवेंद्र क्या करेगा', अशी उपहासात्मक टीका त्यांच्यावर केली गेली होती; परंतु या दोन्ही त्यांनी सत्तेवर असलेल्या तिन्ही पक्षांना धोबीपछाड दिलीच, पण नंतर एक मोठा राजकीय भूकंप महाराष्ट्राने पाहिला, राष्ट्रहित, जनहित आणि पक्षहित यासाठी ते आपल्या बुद्धिमत्तेचा वापर करीत असतात, हे पुन्हा एकदा सिद्ध, झाले,

राजकारणात प्रत्येक ठिकाणी गट हे असतातच; परंतु देवेंद्रजी असे गट तट हाताळण्यात अतिशय वाकबगार आहेत. नवी मुंबई, नगर, ठाणे आणि राज्यातल्या इतर विभागातील अशा गटा-तटांना त्यांनी अतिशय उत्तमपणे हाताळले. एखाद्याला काही देता आले नाही तरी कार्यकर्ता त्यांच्यावर नाराज होत नाही, एवढे प्रेम आणि विश्वास ते त्या कार्यकर्त्याला देतात.

विधान परिषद, राज्यसभा किंवा राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीदरम्यान पक्षाच्या बैठका होत असायच्या, भोजनही एकत्रित व्हायचे. देवेंद्रजी प्रत्येकाच्या टेबलावर जाऊन त्यांच्याबरोबर पाच, दहा मिनिटे घालवायचे, विषय समजून घ्यायचे, सर्वांना वेळ देणे, सर्वांचा सन्मान करणे, हा त्यामागील त्यांचा प्रयत्न असायचा. परवाच राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीदरम्यान टावडन हॉटेलमध्ये आम्ही वीस-पंचवीस आमदार त्यांच्याभोवती बसली होती. एका बाजूला ते आमच्याशी गप्पा मारत होते, दुसऱ्या बाजूला शासकीय कामकाज करत होते, पत्रांवर सह्या करीत होते. आमदार श्री. आशीष जयस्वाल यांनी व्यक्त केलेली खंत अतिशय बोलकी आणि देवेंद्रजी यांची प्रगल्भता अधोरेखित करणारी होती. 'आमचे नेतेही आम्हाला असेच जवळ येऊन बसले असते तर आज असा प्रसंग घडला नसता.'

कुणी कितीही हिणवले, टीका केली तरी दुसऱ्याचा सन्मान करण्याकडे देवेंद्रजी यांचा कल असतो. मला आठवते, नवी मुंबईच्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आमदार नरेंद्र पाटील यांनी एक कार्यक्रम घेतला होता. त्यावेळी देवेंद्रजी राज्याचे मुख्यमंत्री होते. प्रोटोकॉलप्रमाणे मुख्यमंत्री सभेत सर्वांत शेवटी भाषण करीत असतात, परंतु त्यांनी मनाचा मोठेपणा दाखवून उद्धव ठाकरे यांना शेवटी भाषण करण्याचा मान दिला.

प्रत्येक कार्यकर्त्याला देवेंद्रजी आपले वाटतात, कारण तेही आपल्या कार्यकर्त्याला मनापासून जपत असतात, नागपूरला ते कामात खूप व्यस्त होते. एका कार्यकर्त्याचे लग्न होते, व्यस्ततेमुळे लग्नाला जाणे शक्य नसल्यामुळे व्यस्त कार्यक्रमातून वेळ काढून त्यांनी शुभेच्छा देणारा एक व्हीडिओ शूट केला आणि तो त्या कार्यकर्त्याला पाठवला. हा कार्यकर्ता आणि देवेंद्रजी यांच्यातील ऋणानुबंध आहे.

देवेंद्रजी मुख्यमंत्री असताना त्यांनी त्यांच्या पुढाकाराने मंत्रालयात वैद्यकीय कक्ष उभारला गेला होता. या कक्षाची महाराष्ट्रात खूप चर्चा झाली, लाखो रुग्णांना मदतीचा हात मिळाला, अनेकांचे जीव वाचले. आजही हजारो कुटुंब 'देवेंद्रजींना दुवा देतात. नंतर आलेल्या सरकारने हा कक्ष बंद केला असला तरी त्याची गरज लक्षात घेऊन लाखो रुग्णांना मदत मिळवून देणारा कक्ष ते पुन्हा मंत्रालयात सुरू करतील, असा मला विश्वास आहे.

देवेंद्रजींबद्दल कितीही पाने लिहिली तरी कमी पडतील. मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांना दीर्घायू मिळो आणि त्यांच्याकडून महाराष्ट्राची आणि देशाची सेवा निरंतर घडो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. मनापासून शुभेच्छा!

# धक्कादायक.... अनाकलनीय

**सिनेमाचं जग 'बाहेरुन' जेवढं आणि जसं दिलखुलास, ग्लॅमरस, सुखवस्तू, गुलछबू असल्याचे 'दिसतं' तसंच ते खरंच आहे का असा प्रश्न अधूनमधून पडतो आणि त्याला निमित्त ठरते, एकाद्या कलाकाराचा धक्कादायक,अनाकलनीय, अनपेक्षित मृत्यू.**

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

रवींद्र महाजनींच्या निधनानंतर पुन्हा याच गोष्टींवर 'फोकस' टाकण्याची वेळ येते आणि सोशल मिडियात, जनसामान्यांना प्रश्न पडतो एकेकाळच्या मराठीतील अतिशय देखण्या, हॅन्डसम, रुबाबदार अशा 'नायकाच्या नशिबी' असा मृत्यू का यावा? वयाची सत्तरी, पंचाहत्तरीनंतर काही महिने कुटुंबापासून दूर राहणे, एकाकी आयुष्याला पसंती देणे असं विविध क्षेत्रातील काहीजण स्वतः हूनच स्वीकारतात. 'एकटं जगण्यात काहींना एक प्रकारचा आनंद मिळतो'. कुठे तरी मानसिक, भावनिक शांतता, समाधान हवे असते. अनेक वर्ष स्पर्धेच्या जगात वावरताना स्वतःकडे, स्वतःच्या आवडीनिवडीकडे, कदाचित तब्येतीकडे फारसे लक्ष देता आलेले नसते. वयानुसार व्यायाम करणे, भरपूर वाचन करणे, योगाला प्राधान्य देणे, जुने चित्रपट पुन्हा पुन्हा पाहणे, गीत संगीत ऐकून तृप्त होणे, ओटीटीवर चांगला कन्टेट पाहणे, स्वतःच आवश्यक असे पदार्थ करणे आणि दिवसभरातून दोन तीनदा मोबाईलवर कुटुंबाशी संपर्क करणे, छान गप्पांत रमणे असं 'एकट्याचे आयुष्य' जगणारे आणि तसं जगताना आपल्या मूळ शहरापासून दूर राहणारे असे विविध क्षेत्रात अनेक आहेत. तसे आयुष्य जेव्हा सेलिब्रिटीज स्वीकारतो तेव्हा त्याचे आर्थिक पातळीवर मूल्यमापन होते. इतका पैसा असूनही कुटुंबापासून दूर का राहिले? (मराठी चित्रपट व नाटकातून भूमिका साकारताना पूर्वी फार पैसे मिळत नसत. उलट मानधनाचा 'शेवटचा हप्ता' हमखास बुडायचा. मागील पिढीतील अनेक मराठी कलाकार या आर्थिक अडवणूकीच्या अनुभवातून दुर्दैवाने गेलेत.) आणखीन एक प्रश्न (खरं तर गॉसिप्सच) 'सेलिब्रिटीज पिता व पुत्र यांच्यात काही अंतर होते का? (सेलिब्रिटीज असो अथवा आणखीन कोणीही असो, त्यांच्या खाजगी आयुष्यात डोकावणे अजिबात योग्य नाही ही समज वा मॅच्युअर्ड वृत्ती हवी. पण याचे भान दुर्दैवाने राहत नाही.)





या सगळ्यात 'शॉकिंग' असते ते एकाद्याचा मृत्यू झाल्याचे दुर्दैवाने दोन तीन दिवसांनी लक्षात येणे. बराच काळ प्रकाशझोतात राहिलेल्या माणसाच्या नशिबी हे यावे? नियती निष्ठूर असते की 'खेळ कुणाला दैवाचा कळला...' हेच एक मोठे सत्य असते?

रवींद्र महाजनींच्या बहुस्तरीय कारकीर्द, त्यांचे प्रसन्न व्यक्तिमत्त्व यावर बराच फोकस पडला. त्यात एक गोष्ट विशेष उल्लेखनीय. दिग्दर्शक के. ए. अब्बास यांच्या 'सात हिन्दुस्तानी' (मुंबईत रिलीज २१ मे १९७१) या चित्रपटात त्यांनी अमिताभ बच्चनसोबत एक जबरा सीन साकारलाय. हा चित्रपट गोवा मुक्ती संग्रामावर आधारित आहे आणि सातपैकी एक सैनिक अमिताभने साकारलाय. तर रवींद्र महाजनी पोर्तुगीज पोलीस इन्स्पेक्टर आहेत. तेच या अब्दुलला (अमिताभ) फटकावत जाब विचारतात. रवींद्र महाजनींच्या चित्रपट, रंगभूमी व मालिका अशा वाटचालीतील ही एक वेगळीच गोष्ट.

परवीन बाबीच्या आयुष्याचा 'द एण्ड' असाच 'ॲन्टी क्लायमॅक्स' होता. सत्तरच्या दशकातील 'टॉप फाईव्ह' ग्लॅमरस रुपातील स्टारपैकी ती एक. मॉडर्न रुपडं हाच जणू अभिनय मानणारी. अमिताभची फेवरेट. त्या काळातील आघाडीच्या दिग्दर्शकांच्या (रमेश सिप्पी, मनमोहन देसाई, प्रकाश मेहरा, हृषिकेश मुखर्जी, मनोजकुमार, रवि टंडन, रमेश बहल, एस. रामनाथन इत्यादी) चित्रपटातून भूमिका साकारत आपली 'स्पेस' निर्माण करणारी परवीन ऐंशीच्या दशकात चित्रपटसृष्टीपासून दूर होत गेली. चित्रपटसृष्टीला कोणाहीसाठी थांबायला वेळ नसतो आणि एव्हाना कलाकारांची पुढची पिढी आलेली असते. ती आपली जागा निर्माण करते.

परवीन बाबी मानसिक स्वास्थ्यासाठी युरोपला स्वामी यू. जी. कृष्णमूर्ती यांच्याकडे गेल्याचे गॉसिप्स मॅगझिनमधून रंगवून लिहिले गेले. हीच गोष्ट ती आता चित्रपटसृष्टीत नाही हेच अधोरेखित करणारी. अनेक वर्षांनी परवीन बाबी मुंबईत परतली. एव्हाना चित्रपटसृष्टीत व मिडियात बराच बदल झाला होता. स्थित्यंतर झाले होते. एक पीआरओ परवीन बाबीच्या भेटीसाठी फोन करु लागल्यावर समजले ती परतरलीय आणि 'तिला काही सांगायचयं'. आताचं परवीन बाबीचं रुपडं, फिटनेस, व्यक्तिमत्व पहिल्यासारखं नसणार हे स्वाभाविक होतेच. पण इतकं अस्ताव्यस्त, काहीसं बेढब असेल असंही वाटलं नव्हतं.

तिच्या जुन्या दुखण्याच्या खपला जाग्या झाल्या होत्या. हे एकाकी आयुष्य वेगळ्या प्रकारचे होते. लाईम लाईटपासून कोसो दूर गेल्यानंतरचं ते दु:ख होते. आणि अशातच २० जानेवारी २००५ रोजी तिचं असेच ती घरात 'एकटी' असतानाच निधन झाले. तेदेखील कसे समजले? तर तिच्या घराच्या दरवाज्याला लावलेली वृत्तपत्र, दूध दोन दिवस झाले तरी तशीच होती आणि आता तिच्याही रुमबाहेर विचित्र वास येत होता. पोलिसांनी दरवाजा फोडल्यावर समोर परवीन बाबीचा निपचित मृतदेह होता. लाईट्स... कॅमेरा...ॲक्शन याची कधी काळी सवय असलेल्या कलाकाराला नियतीने असे 'कट' म्हणावे? रिटेक तर शक्यच नसतो. कारण हाच आयुष्याचा शेवट असतो. याला उत्तर नसते आणि शोधायचेही नसते. सापडणारही नसते.

श्रीदेवीचे निधनही असेच विलक्षण धक्कादायक. आश्चर्यकारक. आयुष्य क्षणभंगुर आहे हेच अधोरेखित करणारे आणि त्यात सतत टर्न आणि ट्वीस्ट. दुबईत आपला पती बोनी कपूरसोबत असताना टब बाथमध्ये गेलेली श्रीदेवी बराच काळ झाला तरी बाहेर न येणे आणि मग बाथरुमचा दरवाजा फोडल्यावर ती टबमध्येच बुडून मरण पावल्याचे लक्षात येणे हे अतिशय अनाकलनीय आणि काहीसं संशयास्पद.

पण एक दुर्दैवी सत्य. २४ फेब्रुवारी २०१८ रोजी हे घडल्यावर आठवडाभर अनेक गोष्टींवर उलटसुलट चर्चा रंगली, गॉसिप्स झाले. एका टॉपच्या अभिनेत्रीच्या नशिबी असे येणे हे विलक्षण धक्कादायक. सेलिब्रिटीजच्या आयुष्यातील 'न दिसणारा' (मिडियातून न दाखवला जाणारा बेभंरवसा) असा अनाकलनीय असतो. त्याहीपेक्षा दुर्दैव म्हणजे, आयुष्याचा शेवट शांतपणे न होणे.

ललिता पवार (मृत्यू २४ फेब्रुवारी १९९८), सिल्क स्मिथा (मृत्यू २३ सप्टेंबर १९९६) यांच्या आयुष्यचा शेवटही 'एकटी'नेच झाला. त्यांचा मृत्यू झाल्याचे असेच दोन तीन दिवसानंतर 'दिसून' आले. आयुष्यभर यश व लोकप्रियता मिळवूनही शेवट असा व्हावा अशीच नियतीची पटकथा का असावी? यात काहीसा योगायोगही असतो. एकदा कलाकार रुपेरी पडद्यापासून दूर दूर होत गेला. काहीसा 'संपर्क क्षेत्राबाहेर' गेला की तो काय करतोय, कसा जगतोय याची 'खबर' मिळणे हळूहळू कठीण होत जाते. आजच्या गतिमान जीवनात तर अशा अनेक जुन्या काळातील कलाकारांचा बराच विसर पडतो. चित्रपट मिडियाला (विशेषत: डिजिटल मिडियात) गॉसिप्स, ग्लॅमर, फिल्मी चटपटीत गप्पा आणि चित्रपटाच्या उत्पन्नाचे कोटीतील आकडे याच चौकटीत रस असतो. त्यापलिकडे जाऊन माहिती मिळवायची त्यांची तयारी नाही. गुगलबाहेर सिनेमाचे मोठे जग आहे हे त्यांना जणू नकोय. कारण त्यात टीआरपी नाही, पण एकाद्या कलाकाराचे निधन झाल्याचे दोन तीन दिवसांनी समजले तर त्यात ते टीआरपीयोग्य काही मसाला मिळतात का याचा शोध घेतात हे दुर्दैव.

माणसाला मृत्यू अटळ आहे. पण तो नेमका कधी, कसा, केव्हा हे कोणालाच माहीत नाही हीच तर जगण्यातील गंमत आहे...विधिलिखित काय आहे हे कोणीच सांगू शकत नाहीत.







# एक होती इर्शाळवाडी!

**निसर्गाच्या कुशीत वसलेल्या रायगड जिल्ह्याच्या खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडीत आता उरल्यात कटू आठवणी... मुसळधार पावसात अंधाऱ्या रात्री या आदिवासी वाडीवर दरड कोसळून घरांसह आतील माणसे ढिगाऱ्याखाली गाडली गेली... काही क्षणांमध्ये होत्याचे नव्हते झाले...!**



मुंबई-गोवा महामार्गावरील चौकजवळील इर्शाळवाडी नैसर्गिक आपत्तीमुळे प्रकाशझोतात आली आहे. गेल्या चार दिवसांत अनेकांची पावले तिकडे वळली, पण इर्शाळगडावर जाणाऱ्या गिर्यारोहकांसाठी ही आदिवासीवाडी आधीपासूनच परिचयाची. त्यांच्या मोहिमेतील हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. त्यामुळे भटकंती करण्यासाठी जाणारी मंडळी आवर्जून तिथे काही काळ विसावा घेऊन पुढे चढाई करतात. साहजिकच स्थानिक ग्रामस्थांचा शेतीखेरिज पर्यटन व्यवसायावर उदरनिर्वाह चालतो. दमलेल्या पांथस्थांना खाणे-पिणे देऊन त्यांचा थकवा दूर करण्याचे काम आदिवासी लोक आवडीने करीत. आता मात्र तेथील उरलेल्या ग्रामस्थांनाच आधार देण्याची वेळ आली आहे.

इर्शाळवाडीसाठी बुधवारचा दिवस नेहमीसारखा होता. दिवसभर काबाडकष्ट करून गावकरी रात्री निद्रेच्या अधीन झालेले असताना ११च्या सुमारास अचानक डोंगराचा भाग वाडीवर कोसळला. खालच्या बाजूला असलेल्या शाळेत या वाडीवरील काही मुले झोपायला गेली असताना त्यांना मोठा आवाज ऐकायला आला. काय झाले म्हणून ते पहायला गेले असता भयंकर घटना घडल्याचे दिसले. याबाबत पायथ्याशी जाऊन सांगण्याशिवाय त्यांच्या हाती काही उरले नव्हते. सुमारे ४८ घरे आणि २२० लोकवस्ती असलेल्या इर्शाळवाडीतून कामानिमित्त बाहेरगावी गेलेले लोक, शिक्षणासाठी अन्यत्र असलेले विद्यार्थी, वाडीतील शाळेत झोपायला गेलेली मुले, मासे व खेकडे पकडण्यासाठी बाहेर पडलेले लोक आणि प्रसंगावधान राखून बाहेर पडलेले ग्रामस्थ वगळता सारे जण ढिगाऱ्याखाली दबले गेले. जशी माळीण आणि तळीयेची घटना मन सुन्न करणारी होती, तशीच इर्शाळवाडीतील निःशब्द करणारी आहे.

दुर्घटनेनंतर युद्धपातळीवर शोध व बचावकार्य सुरू आहे. शासकीय यंत्रणा आणि स्वयंसेवी संघटना हातात हात घालून कार्यरत आहेत. ढिगाऱ्याखाली जे कुणी जिवंत आहेत त्यांना बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले जात आहे, तर मयतांचे शव बाहेर काढून मूठमाती दिली जात आहे. उंचावरील भौगोलिक स्थान, सततचा पाऊस, धुके बचावकार्यात अडथळा निर्माण करीत आहे. तरीही सगळ्या समस्यांवर मात करून मदतीचे हात झटत आहेत. विशेष म्हणजे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पायवाटेने चढून जाऊन घटनास्थळी पोहचले आणि त्यांनी आपद्ग्रस्तांना धीर दिला. तत्पूर्वी रात्रीच ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन हे स्थानिक आमदार महेश बालदी यांच्यासमवेत इर्शाळवाडीत पोहचले होते. पनवेलचे संवेदनशील आमदार प्रशांत ठाकूरही सकाळी दाखल झाले. त्यानंतर अनेक मंत्री, लोकप्रतिनिधी तेथे जाऊन पाहणी करून आढावा घेत आहेत.

इर्शाळवाडीतील दुर्घटनेमुळे जुन्या आठवणी जाग्या झाल्या आहेत. अतिवृष्टीमुळे २००५ साली रायगड जिल्ह्यातीलच महाड तालुक्यात असलेल्या दासगावसह जुई, कोंडिवते व रोहन गावात दरडी कोसळून एकूण १९४ जणांचा मृत्यू झाला होता. २०१४मध्ये पुणे जिल्ह्यातील माळीण गाव दरडीखाली जमीनदोस्त होऊन १५१ लोकांचा बळी गेला. दोन वर्षांपूर्वी रायगडातील महाडमधील तळीये गावावरही काळाने असाच घाला घातला. यात ८७ जण मृत्युमुखी पडले होते. त्याचवेळी शेजारील पोलादपूर तालुक्यातील सुतारवाडी आणि केवनाळे येथे दरड कोसळून ११ जणांचा मृत्यू, तर काही जण जखमी झाले.

अशा घटनांमध्ये वाढ होताना दिसत आहे. खरंतर पावसाळ्यापूर्वी दरडप्रवण गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात येत असतो, मात्र अनेक लोक त्याकडे दुर्लक्ष करतात. नुकतीच दुर्घटना घडलेली इर्शाळवाडी दरडप्रवण क्षेत्रात नव्हती. तरीही तेथे नैसर्गिक संकट ओढावले. याची कारणे तज्ज्ञ सांगू शकतील. एवढे मात्र नक्की की डोंगरभागात राहणाऱ्यांनी इतरत्र स्थलांतरित होणे काळाची गरज आहे. बऱ्याचदा लोक आपण राहत असलेली जागा सोडण्यास तयार होत नाही, कारण त्यांच्या भावना तेथे जोडल्या गेलेल्या असतात, पण मरणापेक्षा स्थलांतर केव्हाही चांगले. किमान पावसाळ्याच्या चार महिन्यांमध्ये तरी सुरक्षित ठिकाणी वास्तव्य करणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने प्रबोधन आणि व्यवस्था व्हायला हवी, जेणेकरून अशी मनुष्यहानी टाळता येईल.

**-समाधान पाटील, पनवेल**


**जाहीर प्रगटन**

नांदेड येथील जिल्हा न्यायाधीश -२ तथा अति सत्र न्यायाधीश
नांदेड यांच्या न्यायालयात

एम. ए. सी. पी. क. :- २१० / २०२१ शिवाजी माधवराव अरसुळे वि. मे. रीजुल इंटरप्राईझेस ( नोटीस )

गैरअर्जदाराचे नाव

१) मे. रीजुल इंटरप्राईझेस
सचिन प्रकाश सोनटक्के, वय सज्ञान धंदा व्यवसाय,
रा. क्लासीक कल्पतरु, रुम नं ए १०५, नं. १७, सेक्टर-१६, न्यु पनवेल, ता. पनवेल, रायगड- ४१०२०६

ज्याअर्थी अर्जदार शिवाजी माधवराव अरसुळे वय ३९ वर्षे नौकरी रा. तामसा ता. हदगाव जि. नांदेड यांनी एम. ए. सी. पीक २१८/२०११ हे प्रकरण गैरअर्जदारा विरुध्द नुकसान भरपाई रक्कम वसुली करीता या न्यायालयात दाखल केले आहे.

त्याअर्थी उपरोक्त प्रकरणात आपल्या उपस्थितीसाठी ब-याच वेळा समन्स व नोटीस काढण्यात आले परंतू ते न बजावता परत आले, आपण समन्स घेण्यास जाणून बुजून टाळाटाळ करीत आहात असे अर्जदार यांचे म्हणणे आहे.

सबब हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे. करीता दिनांक **२३/०८/२०२३** रोजी सकाळी ११.०० वाजता आपण जातीने किंवा वकिलामार्फत या न्यायालयात हजर रहावे.

याद्वारे आपणास नोटीस देण्यात येते की, आपण दिनांक **२३/०८/२०२३** रोजी या न्यायालयात उपस्थित राहण्यास कसूर केल्यास सदरील नुकसान भरपाईचा अर्ज एकतर्फी निकालात काढण्यात येईल.

आज दिनांक २८/०६/२०२३ रोजी माझ्या सहिनीशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**सही/-**
**क. लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**आदेशावरून**
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक,**
**जिल्हा न्यायालय, नांदेड**

**जाहीर प्रगटन**

नांदेड येथील जिल्हा न्यायाधीश -२ तथा अति सत्र न्यायाधीश
नांदेड यांच्या न्यायालयात

एम. ए. सी. पी. क. :- २१८ / २०२१ गजानन मारोती दुगाले वि. मे. रीजुल इंटरप्राईझेस ( नोटीस )

गैरअर्जदाराचे नाव

१) मे. रीजुल इंटरप्राईझेस
सचिन प्रकाश सोनटक्के, वय सज्ञान धंदा व्यवसाय,
रा. क्लासीक कल्पतरु, रुम नं ए १०५, नं. १७, सेक्टर-१६, न्यु पनवेल, ता. पनवेल, रायगड- ४१०२०६

ज्याअर्थी अर्जदार गजानन पि. मारोती दुगाले वय ३५ वर्षे व्यवसाय शेती व दुध विक्रेता रा. वैपाना ता. हदगाव जि. नांदेड यांनी एम. ए. सी. पी क २१८ / २०११ हे प्रकरण गैरअर्जदारा विरुध्द नुकसान भरपाई रक्कम वसुली करीता या न्यायालयात दाखल केले आहे.

त्याअर्थी उपरोक्त प्रकरणात आपल्या उपस्थितीसाठी ब-याच वेळा समन्स व नोटीस काढण्यात आले परंतू ते न बजावता परत आले, आपण समन्स घेण्यास जाणून बुजून टाळाटाळ करीत आहात असे अर्जदार यांचे म्हणणे आहे.

सबब हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे. करीता दिनांक **२३/०८/२०२३** रोजी सकाळी ११.०० वाजता आपण जातीने किंवा वकिलामार्फत या न्यायालयात हजर रहावे.

याद्वारे आपणास नोटीस देण्यात येते की, आपण दिनांक **२३/०८/२०२३** रोजी या न्यायालयात उपस्थित राहण्यास कसूर केल्यास सदरील नुकसान भरपाईचा अर्ज एकतर्फी निकालात काढण्यात येईल.

आज दिनांक २८/०६/२०२३ रोजी माझ्या सहिनीशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**सही/-**
**क. लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**आदेशावरून**
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक,**
**जिल्हा न्यायालय, नांदेड**

**जाहीर प्रगटन**

नांदेड येथील जिल्हा न्यायाधीश -२ तथा अति सत्र न्यायाधीश
नांदेड यांच्या न्यायालयात

एम. ए. सी. पी. क. :- २१७ /२०२१ साहेबराव सुर्यवंशी वि. मे. रीजुल इंटरप्राईझेस (नोटीस )

गैरअर्जदाराचे नाव

१) मे. रीजुल इंटरप्राईझेस
सचिन प्रकाश सोनटक्के, वय सज्ञान धंदा व्यवसाय,
रा. क्लासीक कल्पतरु, रुम नं ए १०५, नं. १७, सेक्टर-१६, न्यु पनवेल, ता. पनवेल, रायगड- ४१०२०६

ज्याअर्थी अर्जदार शिवाजी माधवराव अरसुळे वय ३९ वर्षे नौकरी रा. तामसा ता. हदगाव जि. नांदेड यांनी एम. ए. सी. पीक २१८/२०११ हे प्रकरण गैरअर्जदारा विरुध्द नुकसान भरपाई रक्कम वसुली करीता या न्यायालयात दाखल केले आहे.

त्याअर्थी उपरोक्त प्रकरणात आपल्या उपस्थितीसाठी ब-याच वेळा समन्स व नोटीस काढण्यात आले परंतू ते न बजावता परत आले, आपण समन्स घेण्यास जाणून बुजून टाळाटाळ करीत आहात असे अर्जदार यांचे म्हणणे आहे.

सबब हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे. करीता दिनांक **२३/०८/२०२३** रोजी सकाळी ११.०० वाजता आपण जातीने किंवा वकिलामार्फत या न्यायालयात हजर रहावे.

याद्वारे आपणास नोटीस देण्यात येते की, आपण दिनांक **२३/०८/२०२३** रोजी या न्यायालयात उपस्थित राहण्यास कसूर केल्यास सदरील नुकसान भरपाईचा अर्ज एकतर्फी निकालात काढण्यात येईल.

आज दिनांक २८/०६/२०२३ रोजी माझ्या सहिनीशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**सही/-**
**क. लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**आदेशावरून**
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक,**
**जिल्हा न्यायालय, नांदेड**

**जाहीर प्रगटन**

नांदेड येथील जिल्हा न्यायाधीश -२ तथा अति सत्र न्यायाधीश
नांदेड यांच्या न्यायालयात

एम. ए. सी. पी. क. २१९/२०२१ राम राघोजी जगाडे वि. मे. रीजुल इंटरप्राईझेस (नोटीस )

गैरअर्जदाराचे नाव

१) मे. रीजुल इंटरप्राईझेस
सचिन प्रकाश सोनटक्के, वय सज्ञान धंदा व्यवसाय,
रा. क्लासीक कल्पतरु, रुम नं ए १०५, नं. १७, सेक्टर-१६, न्यु पनवेल, ता. पनवेल, रायगड- ४१०२०६

ज्याअर्थी अर्जदार राम राघोजी जगाडे वय ५२ वर्षे नौकरी रा. तामसा ता. हदगाव जि. नदिड यांनी एम. ए. सी. पीक २१८/२०११ हे प्रकरण गैरअर्जदारा विरुध्द नुकसान भरपाई रक्कम वसुली करीता या न्यायालयात दाखल केले आहे.

त्याअर्थी उपरोक्त प्रकरणात आपल्या उपस्थितीसाठी ब-याच वेळा समन्स व नोटीस काढण्यात आले परंतू ते न बजावता परत आले, आपण समन्स घेण्यास जाणून बुजून टाळाटाळ करीत आहात असे अर्जदार यांचे म्हणणे आहे.

सबब हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे. करीता दिनांक **२३/०८/२०२३** रोजी सकाळी ११.०० वाजता आपण जातीने किंवा वकिलामार्फत या न्यायालयात हजर रहावे.

याद्वारे आपणास नोटीस देण्यात येते की, आपण दिनांक **२३/०८/२०२३** रोजी या न्यायालयात उपस्थित राहण्यास कसूर केल्यास सदरील नुकसान भरपाईचा अर्ज एकतर्फी निकालात काढण्यात येईल.

आज दिनांक २८/०६/२०२३ रोजी माझ्या सहिनीशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**सही/-**
**क. लिपीक**

कोर्टाचा शिक्का

**आदेशावरून**
**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक,**
**जिल्हा न्यायालय, नांदेड**

**ॲड. आशा अरुणकुमार भगत**
**ने. ता. २८/८/२३**

**जाहीर नोटीस**

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश साहेब वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

**दि.चौ. अर्ज क्र. २३४/२०२३**
**निशाणी क्रमांक नि. ७/ड**

१. श्री मंगेश बापु दिपक
वय ३२ वर्षे धंदा - नोकरी
२. श्रीमती माया बापु दिपक
वय ५७ वर्षे धंदा - काहीनाही
३. सौ. ज्योती बाळू गायकवाड
वय ३६ वर्षे धंदा-नोकरी
४. सौ. भारती राहुल अमृतसागर
वय २९ वर्षे धंदा-नोकरी
रा. संघर्ष चाळ, पी.एल लोखंडे मार्ग
मुकुंद नगर चेंबुर मुंबई ४१००८९.

क्रमांक १ ते ३ सध्या रा. सौशल्या सोसायटी
बिल्डींग ५- एच पाचवा माळा,
रुम ५०३, ममदाप नेरळ (पू)
नेरळ महाराष्ट्र ४१०१०१

क्रमांक १ ते ३ रा. १०१ इंद्रदेव बिल्डींग प्लॉट २९,
सेक्टर १२ कामोठे तालुका पनवेल
जिल्हा रायगड महाराष्ट्र ४१०२१८.

अर्जदार

सदरहु अर्जदार क्र. २ यांचे पती व क्रमांक १, ३ व ४ यांचे वडिल कै. बापु देवराम दिपक हे दिनांक २५/०८/२०२० रोजी एम.जी.एम हॉस्पीटल कामोठे, तालुका पनवेल जिल्हा रायगड येथे मयत झाले आहेत. त्यांच्या पश्चात वरील अर्जदार यांची कायदेशीर वारस म्हणुन नोंद होणे अत्यंत गरजेचे आहे. सबब कै. बापु देवराम दिपक यांना वरील अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस आहेत या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. सदरह अर्जदार यांची वंशवेल येणेप्रमाणे -

कै. गोकुळाबाई देवराम दिपक (मयत मुळ पुरुषाची मयत आई )
कै.बापु देवराम दिपक (मयत मुळ पुरुष ) श्रीमती माया बापु दिपक (मयत मुळ पुरुषाची पत्नी)
सौ. ज्योती बाळु गायकवाड (मयत मुळ पुरुषाची मुलगी) श्री. मंगेश बापु दिपक (मयत मुळ पुरुषाचा मुलगा)
सौ. भारती राहुल अमृतसागर (मयत मुळ पुरुषाचा मुलगी)

सदरहु कै. बापु देवराम दिपक यांच्या मृत्युसमयी त्यांच्या नावाची नोंद असलेल्या सदनीकेचे वर्णन येणेप्रमाणे :-.

**मौजे कामोठे पनवेल येथील सदनिकेचे वर्णन**

| अपार्टमेंट क्र. | प्लॉट क्रमांक | सेक्टर क्रमांक | बाजार मुल्य |
|---|---|---|---|
| इंद्रदेव अपार्टमेंट | २९ | १२ | २०,००,०००/- |

सदरहू सदनिका कै. बापु देवराम दिपक व त्यांची मुलगी सौ. ज्योती बाळु गायकवाड यांच्या नावे होती व ती व्यक्ती आजरोजी हयात नाही व अर्जदारांनी सिडको कार्यालयाकडे चौकशी केली असता असे सांगण्यात आले की, ज्यांच्या नावे सदनिका आहे व जर का ती व्यक्ती आजरोजी हयात नसेल तर त्यांच्या पश्चात म्हणजेच कै. बापु देवराम दिपक यांचे कायदेशीर वारस म्हणून त्यांना सदर भूखंड हस्तांतरण करणेसाठी मे. दिवाणी न्यायालयाचा वारस दाखला आणणे आवश्यक आहे. सदर कामी वारस दाखल्याच्या सुस्पष्टतेकामी कोणत्याही तांत्रीक बाबींचा अडथळा येवु नये ह्या कारणास्तव वरील मयत व्यक्तिंचे अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याचे जाहीर करुन मागत आहेत

वरील मिळकतींबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्यांबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत या मे. न्यायालयात दाखल करावी. वरील पध्दतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा वारस दाखला देण्यात येईल, त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. ही नोटीस आज रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिलेली आहे.

**दिनांक : २२/७/२०२३**

**सही/-**
**क. लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सह. अधीक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# साथीचे आजार वाढले

## नवी मुंबईत धोकादायक जीबीएस सिंड्रोमचा प्रादुर्भाव

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पावसाळ्याच्या दिवसात अनेक साथीचे आजार पसरत असून नवी मुंबई शहरात जीबीएस सिंड्रोमचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे. या आजरामुळे मानवी शरीरावर घातक परिणाम होत असून शरीर संवेदनाहीन होऊन श्वास घेणे अडचणीचे होत असल्यामुळे या रुग्णाला कृत्रिम श्वासावर ठेवावे लागत आहे.

नवी मुंबई शहरातील सानपाडा गावात अशा प्रकारचे चार रुग्ण आढळले असल्याची माहिती महापालिकेकडे देण्यात आली आहे. तसेच या प्रकारच्या आजाराबाबत महापालिकेने गांभीर्याने विचार करून तात्काळ आरोग्य सुविधा उपलब्ध करण्याची मागणी केली आहे. तर नवी मुंबई महापालिकेच्या आरोग्य विभागाने अशा प्रकारची कोणतीही लक्षणे आढळल्यास तात्काळ रुग्णालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

रुग्णांमध्ये अशा प्रकारच्या आजाराची लक्षणे कशामुळे होत आहेत हे अद्याप समोर आलेले नाही. नवी मुंबई महापालिकेने पालिकेच्या नेरूळ, ऐरोली, वाशी या तीनही रुग्णालयात अशा प्रकारची लक्षणे आढळणाऱ्या रुग्णांबाबत योग्य खबरदारी घेण्याच्या सूचना आरोग्य यंत्रणेला देण्यात आलेले आहेत.



### महापालिकेने उपचाराबाबत स्वतंत्र कक्ष निर्माण करण्याची मागणी

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात जीबीएस आजाराचे रुग्ण आढळत असून सानपाडा गावात चार रुग्ण आढळले आहेत. जीबीएस सिंड्रोमचा मानवी शरीरावर घातक आहे. त्यामुळे याबाबत नवी मुंबई महापालिकेच्या आरोग्य विभागाला संपर्क केला असून हा आजार खर्चिक असल्याने व रुग्णाला व्हेंटिलेटरची आवश्यकता लागत असल्याने महापालिकेने महापालिका रुग्णालयात स्वतंत्र कक्ष निर्माण करावे, अशी मागणी स्थानिक करीत आहेत.

**नवी मुंबई शहरात जीबीएस सिंड्रोमची लक्षणे आढळल्यास रुग्णाला तत्काळ दाखल करून योग्य ते उपचार करावेत, कारण या आजारामुळे रुग्णाला श्वास घेण्यात अडचण येत असल्यामुळे प्राथमिक स्वरूपातच तात्काळ उपचार घेणे आवश्यक आहे.**

**–डॉ. प्रशांत जवादे,**
**वैद्यकीय अधिकारी,**
**नवी मुंबई महापालिका**

# उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त वंडर्स पार्क येथे वृक्षारोपण

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त नेरुळ येथील वंडर्स पार्कमध्ये शनिवारी (दि. २२) भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी १०० विविध प्रकारच्या फळझाडांच्या रोपांची लागवड करण्यात आली.

बहुसंख्य नागरिकांनी या उपक्रमात सहयोग दिला. या वेळी आयोजक माजी नगरसेवक तथा सभागृह नेते रवींद्र इथापे, माजी नगरसेवक सुरेश शेट्टी, उद्योजक दिनेशभाई पासोरिया, अतिरिक्त आयुक्त संजय निकम, सुनील सैनी, अंकुश हाडवळे, गणेश मोरे, अशोक भांडवलकर, गिरीश देशमुख, राजीव अगरवाल, अनिल लोखंडे, अतुल पांडे, आप्पा इंदोरे, प्रवीण जैन, महादेव गुर्जर, अनिल गुप्ता,अशोक हिंगे, संध्या वारिंगे व सहकारी, रुचिता कर्पे, अजित कौर धिल्लोन व सहकारी तसेच बहुसंख्य महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी संदीप नाईक उपस्थितांशी संवाद साधताना म्हणाले की, सकाळी सात वाजता एवढ्या पावसात देखील मोठ्या संख्येने आपण उपस्थित राहिलात त्याबद्दल मी आपले व रवींद्र इथापे यांचे कौतुक करतो. आज सर्व नवी मुंबई शहरात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त विविध समाजपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्याची सुरुवात या वंडर्सपार्क पासुनच होतेय. आज ज्या पध्दतीने उपमुख्यमंत्री महाराष्ट्रात विकासाची कामे करतात ते पाहिल्यावर अभिमान वाटतो.

रवींद्र इथापे यांनीदेखील महिला व नागरिकांचे आभार मानले व संदीप नाईक यांच्या नेतृत्वाखाली आम्ही नमुंमनपामध्ये एकत्र काम केले असून त्यांनी स्थायी समिती सभापती ते आमदार अशा प्रवासात नवी मुंबईला दिशा देण्याचे काम केले असून, निश्चित स्वरूपात ते भारतीय जनता पक्षाचा झेंडा येत्या मनपाच्या निवडणूकीत नवी मुंबई पालिकेवर फडकवल्याशिवाय राहणार नाहीत याची आम्हाला खात्री आहे, असे रवींद्र इथापे यांनी सांगितले.





**पनवेल : तालुक्यातील पाले बुद्रुक येथे श्री समर्थ बैठक हॉल नव्याने सुरू करण्यात आला आहे. श्री सदस्यांसाठी नव्याने बांधण्यात आलेल्या हॉलला भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत दर्शन घेतले. या वेळी माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील, श्री सदस्य तुळशीराम चाहू तांडेल, गणेश शनिवार पाटील आदी उपस्थित होते.**

# कळंबोलीत रस्ते काँक्रीट करण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली वसाहत सखल भागात असल्याने या ठिकाणी पावसाचे पाणी साचून रस्त्यांची दुरवस्था होत आहे. अनेक वर्षांपासून ही स्थिती कॉलनीमध्ये असल्याने यावर उपाययोजना म्हणून किमान मुख्य रस्ते सिमेंट काँक्रीट करा अशी महत्त्वपूर्ण मागणी शिवसेनेचे कळंबोली शहर प्रमुख तुकाराम सरक यांनी पनवेल महापालिकेकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी मनपा आयुक्त गणेश देशमुख यांना निवेदन दिले आहे.

कळंबोली वसाहतीत कमी पावसातही वसाहत जलमय होते. पावसाचे पाणी रस्त्यावर साचल्याने प्रचंड प्रमाणात दुरवस्था होत आहे. ठिकठिकाणी खड्डे पडतात त्यामुळे कळंबोलीकरांना गैरसोईला सामोरे जावे लागते. दरवर्षी पावसाळ्यात ही स्थिती निर्माण होते. आताही या रस्त्यांची पूर्णपणे चाळण झाली आहे. यावर उपाययोजना म्हणून पनवेल महापालिकेने कळंबोली नोडमधील मुख्य रस्ते पनवेल शहराच्या धर्तीवर सिमेंट काँक्रीट करावे, अशी मागणी शिवसेनेचे शहरप्रमुख तुकाराम सरक यांनी केली आहे.

जेणेकरून जास्त पाऊस झाला तरी रस्ते खराब होणार नाहीत. त्याचबरोबर वारंवार दुरुस्ती आणि डांबरीकरणासाठी पैसे खर्च करावे लागणार नाही. खड्ड्यांच्या समस्येपासूनही येथील नागरिकांची सुटका होईल. वाहनांना निर्विघ्नपणे ये-जा करता येईल, वाहतूक कोंडी आणि अपघात घडणार नाहीत, असा विश्वास सरक यांनी व्यक्त केला आहे.

### ‘हे’ रस्ते सिमेंटचे हवेत

*शिवसेना शाखा ते पल्लवी हॉटेल, के एलई कॉलेज पासून ते तळोजा लिंक रोड, डी मार्ट ते नवी मुंबई पोलीस मुख्यालय, अमर हॉस्पिटल कॉर्नर ते एसबीआय बँक चौक, रोडपाली तलावापासून ते महावितरण सबस्टेशन या रस्त्यांचे सिमेंटकरण करण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाकडे देण्यात आला आहे.*

# तलावामध्ये बुडून महिलेचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

घोटकॅम्प जवळील घोटनदीच्या पात्रातील तलावामध्ये बुडुन एका ४३ वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

घोटगाव येथे राहणारी निता निलेश प्रधान हि महिला घरातून न सांगता निघून गेली होती. तपासात ही महिला घोटकॅम्प जवळील घोटनदीच्या पात्रातील तलावामध्ये मिळून आली. तिला उपचाराकामी रुग्णालय येथे दाखल केले असता डॉक्टरांनी मयत घोषित केले. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे करीत आहेत.



**उरण : डाऊरनगर येथील उंच अशा द्रोणागिरी डोंगरावर असलेला धोकादायक दगड व माती तहसीलदार उद्धव कदम यांच्या अधिपत्याखाली नागरी संरक्षण दल व स्थानिकांच्या मदतीने खाली काढण्यात आला. त्यामुळे द्रोणागिरी डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या डाऊरनगर येथील ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास सोडला.** (छाया : जीवन केणी)

# भाजपतर्फे नेरूळमध्ये विविध कार्यक्रम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात इर्शाळवाडी येथील नैसर्गिक आपत्तीमुळे ओढवलेल्या दुर्घटनेचे भान ठेवून माजी नगरसेवक सुरज पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने, नेरूळमधील आगरी कोळी नाट्यगृहात भाजप नेरूळ विभागाच्या वतीने अभिष्टचिंतन सोहळा २० जुलै रोजी साजरा करण्यात आला. माजी मंत्री, आमदार गणेश नाईक माजी खासदार डॉ. संजीव नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात परिसरातील शालांत परीक्षेत व इयत्ता बारावीच्या परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळवून यशस्वी ठरलेल्या शालेय विद्यार्थ्यांना सन्मानपत्र, शाल देऊन त्यांचा गुणगौरव करण्यात आला तर ज्येष्ठ नागरिकांना शाल व छत्री देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.



प्रारंभी, इर्शाळवाडीतील दुर्घटनेत मृत पावलेल्या व्यक्तींस श्रद्धांजली वाहून सुरु झालेल्या या कार्यक्रमावेळी उपस्थितांशी संवाद साधताना आमदार गणेश नाईक म्हणाले की, सुरज पाटील यांनी जनसेवेचे व्रत घेऊन, त्यात प्रयत्नपूर्वक सातत्य ठेवून, कुकशेत व सारसोळे गाव तसेच परिसरातील वसाहत येथे विविध प्रकारची विकास कामे करुन मानवसेवेचा आदर्श समाजापुढे ठेवला आहे. त्याचबरोबर आज ज्येष्ठांचा आणि मुलांचा गुणगौरव करून, भूतकाळ आणि भविष्यकाळ घडविणाऱ्या या दोन्ही पिढ्यांचा याथायोग्य सन्मान करून आजपर्यंत केलेले समाजसेवेचे काम अधिक अधोरेखित केले आहे. असे सांगून, सुरज पाटील हे सर्वसामान्यांच्या सुखदुःखामध्ये सहभागी होऊन त्यांच्या अडीअडचणी तत्परतेने सोडवणारे व्यक्तिमत्व असल्याचे गौरवोद्गारही नाईक यांनी या वेळी काढले.

या वेळी माजी सभागृह नेते रवींद्र इथापे, सामाजिक कार्यकर्ते गणेश भगत, माजी नगरसेवक गिरीश म्हात्रे, अमित मेढकर, मुनावर पटेल, माजी परिवहन सभापती प्रदीप गवस, माजी नगरसेविका रुपाली भगत, जयश्री ठाकूर, सुजाता पाटील, ॲड. निरंत पाटील, आरपीआयचे चंदू जगताप, विरेंद्र लगाडे, डॉ. डी. वाय पाटील विद्यापीठाचे अधिकारी डी. डी. कोलते, अशोक त्रिपाठी, अजय सिंग ठाकूर, शेखर भोपी, देवनाथ म्हात्रे, गणपतबुवा भोपी, अशोक आतकरी, ॲड. गणेश भगत, सचिन पाटील, अनिल लोखंडे, रामचंद्र पाटील, प्रभाकरराव साळुंखे, शशी जोशी, विजय निंबाळकर, सुभाष हांडे देशमुख यासह ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षण विभागाची २७ शिक्षकांना नियुक्तीसाठी आता अंतिम संधी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महापालिका शाळेत तासिका तत्त्वावर तात्पुरत्या स्वरूपात शिक्षक भरतीमध्ये निवड होऊनही जे शिक्षक अद्याप नियुक्ती पत्र घेण्यासाठी आले नाही, अशा २७ शिक्षकांना शेवटची संधी म्हणून एक नोटीस पाठवण्यात येणार आहे, अशी माहिती शिक्षण विभागाचे उपायुक्त दत्तात्रेय घनवट यांनी दिली. या शिक्षक भरती प्रक्रियेत प्राथमिक आणि माध्यमिक विभागासाठी अद्यापपर्यंत १५१ शिक्षक हजर झाले आहेत.

नवी मुंबई महापालिकेच्या ५३ प्राथमिक व २३ माध्यमिक शाळा असून या शाळांमध्ये तासिका तत्त्वावर तात्पुरत्या स्वरूपात शिक्षक नियुक्ती करण्याचा निर्णय नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त राजेश नार्वेकर यांनी घेतला आहे. प्राथमिक विभागासाठी १२३ शिक्षकांची भरती करण्यात येणार आहे. तसेच माध्यमिक विभागासाठी ६० शिक्षक भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी १० जुलै या दिवशी इच्छूक उमेदवारांकडून कागदपत्र घेण्यात आली. त्यानंतर त्यांची छाननी करून गुणक्रमानुसार (मेरीट) निवड आणि प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यात आली.

प्राथमिक शिक्षक पदासाठी अर्ज ५८० प्राप्त झाले, तर माध्यमिक शिक्षक पदासाठी ५३३ अर्ज प्राप्त झाले. १३ जुलैला प्राथमिक, तर १५ जुलैला माध्यमिक शिक्षकांची निवड आणि प्रतिक्षा यादी प्रसिद्ध केली होती. त्यानुसार नियुक्तीपत्र घेऊन पाच दिवसांत शाळेवर हजर होण्याचे आदेश देण्यात आले आहेत. माध्यमिक शिक्षक पदासाठी ५५ जण पात्र झाले असून त्यापैकी ४६ जण अद्याप पर्यंत हजर झाले नाहीत. प्राथमिक शिक्षक पदासाठी १०५ जण हजर झाले आहेत. निवड होऊनही जे २७ शिक्षक नियुक्तीपत्र घेण्यासाठी आले नाही त्यांना अंतिम संधी म्हणून २४ जुलैला एक नोटीस पाठवण्यात येणार आहे. त्यात त्यांना दोन दिवसांची मुदत देण्यात येणार आहे. या कालावधीत ते उपस्थित झाले नाही, तर प्रतीक्षायादी वरील शिक्षकांचा नियुक्तीसाठी उपस्थित रहाण्यासाठी पत्र पाठवण्यात येणार आहे.

# ‘रोटरी’ अध्यक्षपदी दीपक जांबेकर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटेरिअन कमांडर दीपक जांबेकर यांनी गुरुवारी (दि. २०) रोटरी क्लब ऑफ पनवेल सिटी या क्लबचे दुसरे अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारला. त्यांचा कार्यकाळ एक वर्षासाठी असेल. त्यांचा पदग्रहण समारंभ खांदा कॉलनी येथील रोटरी कम्युनिटी हॉल येथे झाला.

कार्यक्रमासाठी मुख्य अतिथी म्हणून रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१च्या गव्हर्नर रोटेरिअन मंजू फडके लाभल्या होत्या व त्यांच्यासोबत असिस्टंट गव्हर्नर ऋतुजा भोसले याही मंचावर उपस्थित होत्या. रोटरी क्लब ऑफ पनवेल सिटीचे सर्व सदस्य, त्यांचा मित्र परिवार, आप्तेष्ट व रोटरी डिस्ट्रिक्टचे काही ज्येष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत चार्टर अध्यक्ष रोटेरिअन ध्वनी तन्ना यांनी क्लबचा कार्यभार दीपक जांबेकर यांच्या हाती सुपूर्त केला.

या कार्यक्रमाचे चलचित्रीकरण क्लबच्या यूट्यूब चॅनेलवर थेट प्रक्षेपित केले गेले. जांबेकर यांनी संपूर्ण कार्यकारिणी जाहीर केली. क्लबला पदग्रहणाच्या दिवशी १९ लाखांचा मेडिकल क्षेत्रातील सीएसआर मिळाला. याशिवाय त्यांनी पुढील दोन प्रोजेक्ट्सची घोषणादेखील केली.





**पनवेल : उद्धव बाळासाहेब ठाकरे गटातून भारतीय जनता पक्षात नुकतेच प्रवेश केलेल्या देविदास पाटील, मंगेश लबडे यांनी भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी प्रवीण खंडागळे, ज्ञानेश्वर सुर्वे, सुनील माळी, महादेव कांबळे आदी उपस्थित होते.**

# खोपोलीत दरड कोसळण्याची भीती

## तीन हजार नागरिक जीवन-मृत्यूच्या सीमारेषेत

**खोपोली : प्रतिनिधी**

सहा वर्षांपूर्वी माळीणची भयानक दुर्घटना, दोन वर्षांपूर्वी महाड येथील मोठी दुर्घटना व या वर्षी दोन दिवसांपूर्वी घडलेली इर्शाळवाडीची दुःखदायक घटनांनी सारेच हादरले आहेत. अशीच स्थिती खोपोलीतील दरडग्रस्त व धोकादायक घोषित करण्यात आलेल्या सुभाष नगर, काजूवाडी, यशवंत नगर येथे कायम आहे. मुसळधार पाऊस सुरू असला की, खोपोलीतील दरड कोसळण्याची भीती असलेल्या या रहिवासी भागातील नागरिकांची झोप उडते. कोणता दिवस व कोणती रात्र काय घेऊन येईल या भीतीने येथील नागरिक चिंताग्रस्त असतात.


(छाया : जयवंत माडपे)

माळीण दुर्घटनेनंतर खोपोलीतील दरडग्रस्त भागाचे भूगर्भ सर्वेक्षण व तांत्रिक विभागाकडून सर्वे क्षण करण्यात आले आहे. या सर्वेक्षण अहवालानुसार खोपोलीतील काजूवाडी, सुभाष नगर, यशवंतनगर, वर्धमान नगर, सहकार नगर आदी रहिवासी भागाला दरडीचा धोका वर्तविण्यात आलेला आहे तसेच काही उपयोजनाही सूचविण्यात आलेल्या आहेत. यात अतिधोकादायक घरांचे सुरक्षित ठिकाणी पुनर्वसन करणे, वस्ती व डोंगर यांच्यामध्ये मजबूत संरक्षक भिंत उभारणे, जाळी बसविणे, परिसरात माती उत्खनन पूर्णपणे बंद करून नवीन बांधकामास परवानगी देताना पूर्ण सर्वेक्षण करून व उपयुक्त अटी-शर्तीनुसारच परवाना देणे आदी बाबींचा समावेश होता. सहा वर्षांत या अहवालातील कोणत्याही उपाययोजना खोपोली नगरपालिकेने पूर्ण केलेल्या नाहीत. आजही धोकादायक ठिकाणी माती उत्खनन होऊन अनियंत्रित नवीन बांधकामे सुरू आहेत. यावर नगरपालिका व अन्य विभागांनी कोणतेही नियंत्रण मिळविलेले नाही. संरक्षक भिंत बांधण्यासाठी पालिकेने सुरू केले, मात्र याही बाबतीत कामे अपूर्ण अवस्थेत आहेत.

### उपाययोजनेची प्रतीक्षा

याबाबत योग्य कार्यवाही होण्यासाठी स्थानिक नागरिक, माजी लोकप्रतिनिधी व सामाजिक संस्था आणि कार्यकर्त्यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला आहे. विधानसभा अधिवेशनात ही चर्चा घडून आली आहे. आता यावर ठोस उपाययोजनेची प्रतीक्षा आहे.

मागील वर्षी जूनमध्ये शेवटच्या आठवड्यात पडलेल्या पहिल्या पावसात येथील वर्धापन नगर परिसरातील कमला रेसिडन्सी या मोठ्या रहिवासी संकुलात दरड व दगड कोसळले. सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नाही. याचदरम्यान मोगलवाडी भागात डोंगरावरील माती व दगड रहिवासी घरांवर आल्याने घर कोसळण्याची घटना घडली. यात आर्थिक नुकसान झाले. मुसळधार पाऊस सुरू असल्यावर पाण्याच्या प्रवाहाबरोबर मोठ्या प्रमाणात माती व दगडे रहिवासी भागात येण्याच्या घटना येथे नित्याच्याच आहेत.

पावसाला सुरुवात झाली आणि मुसळधार पाऊस कोसळत असेल तर खोपोलीतील या दरडग्रस्त भागातील नागरिकांची झोप उडते. या भागातील जवळपास सहा-सातशे कुटुंबांतील तीन हजार ते ३२०० नागरिक चिंताक्रांत व भयभीत असतात. दरवर्षी दरडी कोसळतात, नुकसान होते. पंचनामाही होतो. नव्याने या समस्येबाबत वरिष्ठ अधिकारी, सार्वजनिक ठिकाणापासून ते नगरपालिका स्तरावर चर्चा होते, मात्र त्यानंतर पाऊस थांबला की पुन्हा सगळे सर्व विसरतात. झालेले ठराव, सुचविण्यात आलेल्या उपाययोजना बंदिस्त अवस्थेत पडतात. खोपोलीत ही अशी स्थिती मागील सात वर्षांपासून आहे. इर्शाळवाडीच्या दुर्दैवी घटने नंतर तरी स्थानिक प्रशासन व पालिकेचे डोळे उघडतील व सुभाष नगर, काजूवाडी, यशवंतनगरसह खोपोली शहरातील अन्य दरडग्रस्त भागांसाठी ठोस उपाययोजना केल्या जातील हा आशावाद निर्माण झाला आहे.

# शासनाच्या तत्परतेमुळे इर्शाळवाडीकर भारावले



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ईशाळवाडीवर १९ जुलैच्या रात्री दरड कोसळली आणि ४८ पैकी जवळपास ३९ कुटुंब व त्यांची घरे दरडीतील मातीच्या ढिगाऱ्याखाली सापडली. शासनामार्फत घटनास्थळी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू असून शक्य ती मदत दिली जात आहे.

या घटनेतून बचावलेल्या सुनील पारधी व कुटुंबाचे नंबराच्या वाडीत राहणारे मित्र चेतन गणपत वाघे, रोशन वाघे, नरेश व अन्य युवक भरपावसात रात्रीच्या अंधारात ईशाळवाडीकडे धावले. त्यांच्यासह जवळपासच्या वाड्यावरील काहीजण घटनास्थळावर पोहचलेल्यानंतर तेथील घटना पाहिल्यानंतर रात्रीच्या अंधारातदेखील भयानक काहीतरी घडले याचा अंदाज येऊ लागला.

या घटनेची वार्ता रात्री शासन व प्रशासनापर्यंत पोहचली. जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्यासह सर्व यंत्रणा रात्रीच घटनास्थळी दाखल होऊ लागली व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मंत्रिमंडळातील विविध विभागांचे मंत्री इर्शाळवाडीच्या मदतकार्याला गती देण्यासाठी हजर झाले. वेगात बचावकार्य सुरू झाल्याने आदिवासी पाड्यावरील दुर्घटनाग्रस्तांचे नम्राची वाडी, नानिवली, मोरबे धरणाच्या बाजूला असलेली आंबेवाडी येथील नातेवाईक व मित्रपरिवार काहीसा निर्धास्त झाला.

सर्व डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या नंबराची वाडी येथे बचावकार्यामध्ये आपले आप्तेष्ट नातेवाईक व मित्रपरिवार यांची माहिती घेण्यासाठी सलग दोन दिवसांपासून बसून आहेत. सुरक्षित असलेल्या आदिवासी पाड्यांतील लोकांना पहिल्यांदा नानिवली नम्राची वाडी येथील जिल्हा परिषद शाळेत सुरक्षितरित्या ठेवण्यात आले. त्यानंतर तेथे त्यांची भोजन, निवारा यासह व्यवस्था केली तसेच विविध स्वयंसेवी संस्थांकडून कपडे आणि अन्य साहित्य उपलब्ध करून देण्यात आले.

लक्ष्मी परशुराम बांगारे यांनी सांगितले की, माझ्या सासरचे जवळपास १५ लोकांचे कुटुंब आदिवासी पाड्यात राहत होते. या पिल्या पारधी यांच्या कुटुंबातील जवळपास सात व्यक्ती दुर्घटनेमध्ये दिसेनासा झाल्या आहेत अजूनही आम्हाला त्या बाबत आशा असल्याने आम्ही इथे थांबलोय. सरकारने मोठ्या प्रमाणात शोध घेण्याचे काम चालू केले आहे. लक्ष्मी भंगारे या जिल्हा परिषद शाळेजवळ थांबून वरील बचाव पथकाकडून काही माहिती येते का याची मोठ्या आशेने वाट बघत होत्या. मुसळधार पावसाची पर्वा न करता युद्धपातळीवर बचावकार्य सुरू आहे. त्यामुळे परिसरात शासन आपल्या पाठीशी खंबीर आहे हा विश्वास आपद्ग्रस्तांमध्ये निर्माण झाला आहे.

# कशेळे ग्रामस्थांची महावितरण कार्यालयावर धडक


(छाया : विजय मांडे)

## वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कशेळे गावात वारंवार वीज खंडित होण्याची समस्या सातत्याने भेडसावत आहे. शिवाय लाईट गेल्यानंतर ती कधी येईल याची चौकशी करण्यासाठी फोन केल्यावर पॉवर हाऊसचे कर्मचारी किंवा वायरमन फोन उचलत नाहीत. याविरोधात कशेळे ग्रामस्थांनी महावितरण कंपनीच्या कार्यालयावर मोर्चा काढला होता.

कशेळेची विद्युत वाहिनी पुढे सावळे, वंजारवाडी, पोटल, हुमगाव, मांडवणेपर्यंत गेली आहे. इतक्या लांब लाईनवर अनेक वेळा फॉल्ट होतात. ते रिपेअर करताना कशेळे येथील जीओडी ओपन करून पुढील रीपेरिंग करणे आवश्यक असते, पण वायरमन तसे न करता कशेळे गावातील लाईन बंद करतात. यामुळे ज्यांचे व्यवसाय विजेवर चालणारे आहेत त्यांना खूप अडचणी येतात. उन्हाळ्यात लहान मुले, वृद्ध व्यक्तींना याचा त्रास होतो.

कशेळे गावातील तीन ट्रान्सफॉर्मर काढून ते दुसऱ्या गाव किंवा फार्म हाऊसला दिल्याने गावात नेहमीच व्होल्टेज कमी असते. दवाखान्याचा ट्रान्सफॉर्मर बिघडला असून त्यातून योग्य तो वीजपुरवठा होत नाही.

या समस्यांबाबत ग्रामस्थांनी अनेक वेळा विद्युत कार्यालयात निवेदने दिली, पण विद्युत बोर्डाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे सर्व ग्रामस्थ आणि व्यापारी शुक्रवार (दि. २१) सकाळी ११ वाजता कशेळे पॉवर हाऊसवर मोर्चा घेऊन गेले आणि गावातील जे दोन ट्रान्सफॉर्मर काढून नेले ते त्वरित बसवणे आणि इतर सर्व समस्यांबाबत त्यांनी कनिष्ठ अभियंता वैभव सिंग यांना निवेदन दिले. याबाबत १५ दिवसांत कार्यवाही झाली नाही, तर पॉवर हाऊस येथे उपोषणाला बसण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

## पोलादपुरात दरडप्रवण ग्रामस्थांचे स्थलांतर

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यांच्या निर्देशानुसार पोलादपूर तालुक्यातील दरडप्रवण सहा गावांतील नागरिकांची सुरक्षित ठिकाणी राहण्याची पूर्ण व्यवस्था करण्यात आली आहे.

पालक अधिकारी, बांधकाम विभाग, महसूल कर्मचारी व पंचायत समिती कर्मचारी यांनी तेथे संयुक्त भेटी दिल्या असून या गावी सर्व ग्रामस्थांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत होण्यासाठी आवाहन करण्यात आल्यावर त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

# ...अन् मदतीसाठी सरसावले अनेक हात!

नैसर्गिक आपत्ती होते तेव्हा त्याला सामोरे जाण्याशिवाय पर्याय नसतो. हवामानासबंधी नैसर्गिक आपत्तींमध्ये उष्णकटिबंधीय चक्रीवादळ, पूर, दुष्काळ, वन्य अग्नी, चक्रीवादळ, उष्णतेच्या लाटा आणि शीतलहरी यांचा समावेश आहे.

नैसर्गिक आपत्ती या अनिश्चित असतात. नैसर्गिक आपत्तीत धोकादायक घटना घडतात की, ज्यात मालमत्ता व वस्तूंचे नुकसान तसेच जीवितहानी व मनुष्यहानी होऊन जनजीवन विस्कळीत होते.

कोकणाला लाभलेला समुद्रकिनारा आणि डोंगररांगांमुळे कोकणात सर्वाधिक पावसाची नोंद होते. त्यामुळे कोकणाला मोठ्या प्रमाणात नैसर्गिक आपत्तीचा सामना ही करावा लागतो. कोकण विभागात एकूण सात जिल्हे असून ५० तालुके आणि सहा हजार ३५३ गावे आहेत. महाराष्ट्र राज्यातील सर्वाधिक म्हणजे सरासरी दोन हजार ते तीन हजार ३६८ मिमी पाऊस हा कोकणात पडतो. विशेषत: मुंबई व ठाणे जिल्ह्यात कमी कालावधीत जास्त पाऊस आणि भरतीची वेळ एकच असल्यास पूर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असते. कोकण विभागात गेल्या सहा वर्षांत सरासरी दोन हजार ७०१.४० मिमी इतक्या पावसाची नोंद झाली आहे. विभागात एकूण ३७१ पूरप्रवण व २२३ दरडग्रस्त गावे आहेत.

कोकणात वारंवार येणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचा सामना करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने तीन हजार २०० कोटी रुपये विविध आपत्ती निवारण कामे करण्यासाठी मंजूर केले आहेत. यामध्ये भूमिगत वाहिन्या, धूप प्रतिबंधक बंधारे, बांध घालणे, बहुउद्देशीय चक्रीवादळात आसरे बांधणे, दरडीप्रवण क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाय, वीज अटकाव यंत्रणा यांचा समावेश आहे. राज्यभरातील २० पूरप्रवण जिल्ह्यांमध्ये एकूण सात हजार ९०० आपदा मित्रांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

असे असताना दरडप्रवण क्षेत्रात न मोडणाऱ्या रायगड जिल्हयातील इशाळगड येथे १९ जुलै रोजी रात्रीच्या वेळी इशाळगडाच्या पोटात वसलेल्या आणि कलावंतीण दुर्गाच्या शेजारी असलेल्या प्रसिद्ध ट्रेकर्स पॉईंट असलेल्या इशाळवाडीवर बुधवारी रात्री दु:खाचा डोंगर कोसळला. शांत निजलेल्या इशाळवाडीत अवघ्या काही क्षणांत होत्याचे नव्हते झाले आणि सारा महाराष्ट्र हादरुन गेला. रायगड जिल्ह्यातील माथेरान आणि आसपासच्या परिसरात गेल्या तीन-चार दिवसापासून मुसळधार पाऊस झाला. त्या मुसळधार पावसामुळे इशाळवाडीतील ४८पैकी १७ घरे गाडली गेली. या दुर्घटनेत जवळपास २० घरांचे गंभीर नुकसान झाल असून उर्वरित दहा घरे वाचली आहेत. या दुर्घटनेची माहिती मिळताच बचाव पथक अवघ्या तासभरातच घटनास्थळी दाखल झाले. गुरुवारी दिवसभरातही पाऊस आणि जोरदारात वाऱ्यामुळे बचाव पथकांची निसर्गाने जणू परीक्षच घेतली. पाऊसामुळे माती निसरडी झाल्याने वाडीपर्यंत पोहचण्यास बचाव पथकाला खूप कष्ट घ्यावे लागत होते. त्यामुळे रात्रीच्या वेळी घटनास्थळी तातडीने बचाव आणि मदतकार्यास सुरू करण्यास अडचणी उद्भवल्या. अत्यंत दुर्गम अशा ठिकाणी ही वाडी असल्याने मदतीसाठी कोणतेही यांत्रिकी साधने आणणे शक्य नव्हते. त्यामुळे फक्त माणसाच्या मदतीने येथे मदत पोहचविणे शक्य होते. एनडीआरएफ, एसडीआरएफ, टिडीआरएफ आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने प्रत्यक्ष मदतकार्यास सुरुवात झाली. याशिवाय ट्रेकर्स ग्रुप, स्वंयसेवी संस्थदेखील मदतीसाठी सरसावल्या.







या दुर्घटनेची माहिती मिळताच गुरुवारी पहाटे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अतिशय कठीण वाट पायाखाली तुडवत दरड दुर्घटनास्थळी जाण्याचा निर्णय घेतला. तब्बल दीड ते दोन तास पायी दगडधोंड्याचा निसरडा चिखलमय निसरडा रस्ता तुडवत प्रसंगी प्रतिकुल परिस्थितीत मुख्यमंत्री शिंदे इर्शाळवाडीवर पोहचले. वाटेत दुर्घटनाग्रस्त कुटूंबीयांशी आस्थेवाईकपणे चौकशी करत जणू त्यांचे दु:खअश्रू पुसण्याचे काम ते करीत होते. एवढयावर न थांबता वेळप्रसंगी हवाई मदतीसाठी सूचना देत अन्न, पाणी, निवाराची सोय आहे की नाही याची जातीने पाहणी करत होते. या त्यांच्या तत्परतेमुळे अनेक जाणते अजाणते हातामध्ये हत्तीच बळ संचारले होते.

यात ठाणे महापालिकेच्या वतीने ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाच्या दोन वाहने तातडीने रवाना करण्यात आल्या. तात्पुरते राहण्यासाठी सोय व्हावी यासाठी आठ कंटेनरदेखील पाठविण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देवून रायगड जिल्ह्यातील उद्योग व संस्थादेखील पुढे आल्या आहेत. रायगड जिल्हा प्रशासनाच्या वतीने सुविधा निर्माण करण्यासाठी साहित्य, घटनास्थळाकडे पाठविण्यात येत होते. यामध्ये मदत साहित्य व निवाऱ्यासाठी घटनास्थळाच्या बेस कॅम्पकडे २० द १० आकाराचे चार कंटेनर पाठविण्यात येत आहेत. ४० बाय १०चे दोन कंटेनर पाठविण्यात आल्या आहेत. हे कंटेनर उरण, जेएनपीटी, रत्नागिरी एमआयडीसी, जेएसडब्ल्यू समूह येथून रवाना झाले आहे. घटनास्थळ उंचावर असल्याने मशिनरी साहित्य पोहचत नसल्याने दरड कोसळून निर्माण झालेले मातीचे ढिगाऱ्या करण्यासाठी दूर करण्यासाठी पनवेल येथून ८० अनुभवी कारागिरांचे पथक औजारासह दाखल झाले आहेत. येथील विद्युतपुरवठा सुरळीत सुरू होण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग विद्युत अभियंता, महावितरण यांचे पथक पाठविण्यात आले आहेत.

यासह यंत्रणेसाठी तात्पुरती निवारा व्यवस्था, अन्न व पिण्याचे पाण्याची व्यवस्था या दुष्टीने महसूल विभागाचे उपविभागीय अधिकारी, जिल्हा परिषदाचे पाणीपुरवठा अभियंता व त्यांची यंत्रणाकाम करत आहेत. तेथे साहित्यसामुग्री व अतिमहत्वाच्या व्यक्तींचा समन्वय, हॅलीपॅड आदी सुविधा तयार केले जात आहेत. जिल्हा शलयचिकित्सक अलिबाग यांच्याकडून जखमींवर उपचार केले जातात. विभागीय आयुक्त महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी योगेश म्हसे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे, जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील मदतकार्यवर लक्ष्य ठेवून आहेत.

स्वत: विभागीय आयुक्त डॉ. कल्याणकर, जिल्हाधिकारी म्हसे दुर्घटनेची माहिती समजल्यानंतर तातडीने रात्री दीड वाजता घटनास्थळी प्रत्यक्ष पोहचले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत उपविभागीय अधिकारी अजित नराळे यांनी खालापूर तहसिलदार आयुब तांबोळी यांनी रात्री परिस्थितीचा अंदाज घेत बचाव कार्यासाठी आवश्यक साधन सामुग्री, मनुष्यबळ उपाययोजनांची तयारी केली. महसूल, जिल्हा परिषद व पोलीस विभागाच्या अधिकारी कर्मचारीसह नागरी संरक्षण दल मुंबई येथून दोन पथके, एनडीआरएफची चार पथके दीडशे मनुष्यबळासह घटनास्थळी पोहचले आहेत. याचबरोबर इतर विभागाच्या अधिकारी व कर्मचारी, ट्रेकर्स, मंडळे जवळपास सातशे जण मदतकार्यास पोहचले आहेत. नवी मुंबई महापालिका अग्निशामक दलाचे पथकात ४४ अधिकारी कर्मचारी दोन जेसीबीसह काम करत आहेत. सहाय्यक अग्निशमन केंद्राअधिकारी शिवराम ढुमणे यांचा हदयविकाराने मृत्यू झाला. एरव्ही शासकीय अधिकारी कर्मचारी कायम टीकेचे धनी होत असतात. भले काम करत असताना वेळप्रसंगी मृत्यूला सामोरे जावे लागते. ही नित्याची बाब झाली आहे, परंतु त्यांच्या कामाची साधी दखल कुठे घेतली जात नाही. हे अतिशय दुर्दैवी बाब आहे.

भर पावसात मदतकार्य सुरू असून गुरुवारी सर्वाधिक १९८ मिमी पावसाची नोंद रायगड जिल्ह्यात झाली. या वेळी कोकण विभागाच्या सरासरी १३६.७ मिमी पाऊस झाला आहे. अशावेळी दुर्घटनास्थळी वाहने पोहचण्यात अडचण असल्याने मदत कार्य थांबू नये यासाठी माहिती असलेल्या स्थानिकांची व संस्थांची मदत घेतली जात आहे. यामध्ये युवा संघटना, महाराष्ट्र सह्याद्री ट्रेकर ग्रुप्स, यशवंती हॅकर्स, विविध ट्रेकर्सचादेखील सहभाग आहे.

मुख्यमंत्र्यांनी केलेल्या आवाहनानंतर तीन हजार फूड पॅकेटस उपलब्ध करण्यात आले आहेत. यासह घटनास्थळावर पाणी बॉटल्स, ब्लँकेट्स, टॉर्च, मदत साहित्य, चादरी, बिस्कीट तसेच इतर प्रथम उपचार साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे.

जिल्ह्याच्या दुर्घटनाग्रस्त आदिवासी पाड्यावर बचाव व मदत कार्यात स्वयंसेवी संस्थांचा सहभाग आहे. मदतीसाठी शासकीय विभागांची, संघटना व स्वयंसेवी संस्थांची मदत पथके रवाना झाली. यामध्ये पुणे, अलिबाग, खोपोली, कर्जत, लोणावळा, पनवेल, वाशी, मुंबई व येथील सहभाग आहे. या दुर्घटनेत मदतकार्यात पशुधनाची काळजी घेण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत दोन पथके स्थापन करण्यात आली आहेत.

पथकामार्फत गुरुवारी ११ शेळ्या व १० गोवर्गीय जनांवरावर उपचार करण्यात आले. तसेच या ठिकाणी एकूण ३ बैल व एक शेळी मृत आढळून आलेली असून, त्यांचे फोटो व पंचनामे करण्यात आले आहे. या पथकांमार्फत जखमी पशुधनास उपचार करणे, मृत पशुधनाचे फोटो व पंचनामे करणे, शास्त्रोक्त पद्धतीने मृत जनावरांची विल्हेवाट लावणे व जखमी पशुधनास खाद्याचे नियोजन करणे इत्यादी कामे करण्यात आली.

एकूणच काय तर जेव्हा एखादी आपत्ती उद्भवते तेव्हा त्या घटनेमागे अनेक कारणे असतात. परंतू दुर्घटनाग्रस्तांना मदतीसाठी अनेक जाणते अजाणते हात तेथे सिंहाचा वाटा उचलत असतात. हे काम करत असताना मदतकर्त्यांना अनेक संकटांना तोंड देत अहोरात्र मदतीचा ओघ सुरू असतो.

**-संजीवनी जाधव-पाटील,**
**सहायक संचालक (माहिती),**
**विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग,**
**कोंकण भवन, नवी मुंबई**

# विराट कोहलीचे विक्रमी शतक

## सर डॉन ब्रॅडमन यांच्याशी केली बरोबरी



**त्रिनिनाद : वृत्तसंस्था**

**भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्यातील दुसऱ्या दिवशी विराट कोहलीने शानदार शतक झळकावले. या शतकाच्या जोरावर त्याने अनेक विक्रम केले मोडले. विराटने आपल्या कारकिर्दीतील ७६वे शतक झळकावत ऑस्ट्रेलियाचे महान फलंदाज सर डॉन ब्रॅडमन यांच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. यासोबतच या सामन्यात अनेक विक्रमही झाले आहेत.**

विराट कोहलीने आपला ५००वा आंतरराष्ट्रीय सामना शतक झळकावून संस्मरणीय बनला. त्याचे हे २९वे कसोटी शतक. या शतकाच्या जोरावर विराटने महान फलंदाज सर डॉन ब्रॅडमन यांच्या विक्रमाशी बरोबरी केली. ऑस्ट्रेलियाचे महान फलंदाज ब्रॅडमन यांनीही आपल्या कसोटी कारकीर्दीत २९ शतके झळकावली आहेत.

भारतीय संघाने नाणेफेक हारल्यानंतर फलंदाजी करताना पहिल्या डावात १२८ षटकांत ४३८ धावा केल्या. या डावात भारताकडून विराट कोहलीने सर्वाधिक धावांचे योगदान दिले. त्याने २०६ चेंडूंचा सामना करताना ११ चौकारांच्या मदतीने १२१ धावांची दमदार खेळी केली.

यानंतर रवींद्र जडेजाने कसोटी कारकिर्दीतील १९वे अर्धशतक झळकावले. तो १५२ चेंडूंत पाच चौकारांच्या मदतीने ६१ धावा करून बाद झाला.

विराट आणि जडेजा यांनी पाचव्या विकेटसाठी १५९ धावांची भक्कम भागीदारी केली.

याचबरोबर अश्विननेही कसोटी कारकिर्दीतील १४वे अर्धशतक झळकावले. तो ७८ चेंडूंत ५६ धावा करून बाद झाला. रॉच आणि वॅरिकन यांच्याशिवाय वेस्ट इंडिजकडून जेसन होल्डरने दोन बळी घेतले. त्याचवेळी शॅनन गॅब्रिएलला एक विकेट मिळाली. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला, तेव्हा वेस्ट इंडिज संघानेही १ गडी गमावून ८६ धावा केल्या होत्या.

यानंतर विराटने म्हटले की, देशासाठी ५०० सामने खेळणे हा माझ्यासाठी मोठा सन्मान आहे. मी माझ्या मेहनतीने हे सर्व साध्य करू शकलो. इथपर्यंत पोहचण्याचा विचार कधीच केला नव्हता. याचा व्हिडीओ भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने शेअर केला.

# आशिया चषक स्पर्धेत आज भारत-पाकिस्तान महामुकाबला

**ढाका : वृत्तसंस्था**

पुरुष उदयोन्मुख संघ आशिया चषक २०२३च्या उपांत्य फेरीत भारत अ संघाने बांगलादेश अ संघाचा ५१ धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने २१२ धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात बांगलादेश अ संघ १६० धावांवर गारद झाला. आता रविवारी (दि. २३) होणाऱ्या अंतिम फेरीत भारत अ संघ पाकिस्तान अ संघाशी भिडणार आहे.

प्रथम फलंदाजी करताना भारत अ संघाने ४९.१ षटकांत सर्वबाद २११ धावा केल्या. यादरम्यान कर्णधार यश धुलने ८५ चेंडूंत सहा चौकारांनिशी ६६ धावा केल्या. अभिषेक शर्माने दोन चौकार व एक षटकारासह ६३ चेंडूंत ३४ धावा केल्या. सलामीवीर साई सुदर्शनने २४ चेंडूत २१ धावा केल्या. त्याच्या खेळीत तीन चौकारांचा समावेश होता. रियान पराग विशेष काही करू शकला नाही. तो १२ धावा करून बाद झाला. निकिन जोसने १७ धावांचे योगदान दिले. मानव सूधरने २१ धावांची खेळी खेळली.

भारताने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना बांगलादेशचा संघ १६० धावांवर गारद झाला. बांगलादेशकडून तंजीम हसनने ५१ धावांची शानदार खेळी केली. त्याने ५६ चेंडूंचा सामना करीत आठ चौकार मारले. मोहम्मद नईमने ३८ धावांचे योगदान दिले. कर्णधार सैफ हसनने २२ धावांची खेळी केली, तर हसन जॉयने २० धावा केल्या. याशिवाय कोणीही विशेष काही करू शकले नाही. अशा प्रकारे बांगलादेशला ५१ धावांनी पराभव स्वीकारावा लागला.

टीम इंडियासाठी निशांत सिंधूने शानदार गोलंदाजी केली. त्याने आठ षटकांत २० धावा देत पाच विकेट्स घेतल्या. मानव सूधरने ८.२ षटकांत ३२ धावा देत तीन विकेट्स घेतल्या. अभिषेक शर्माने तीन षटकांत २१ धावा देत एक विकेट आणि युवराज सिंग डोडियाने सात षटकांत ३५ धावा देत एक विकेट घेतली.

पहिल्या उपांत्य फेरीत पाकिस्तान अ संघाने श्रीलंका अ संघाचा ६० धावांनी पराभव केला. आता अंतिम फेरीत भारताचा सामना पाकिस्तानशी होणार आहे.

# नावडे येथील आविक मुखर्जीला राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेत कांस्यपदक

## आमदार प्रशांत ठाकूर, अरुणशेठ भगत यांच्याकडून कौतुक





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय ज्युनियर बॉईज बॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२३ ही स्पर्धा नुकतीच अरुणाचल प्रदेशातील इटानगर येथे झाली. या स्पर्धेत पनवेल तालुक्यातील नावडे येथील आविक मुखर्जी याने कांस्यपदक जिंकले आहे.

तत्पूर्वी राज्यस्तरीय स्पर्धेत आविकने सुवर्णपदक पटकाविले होते व त्याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. या यशाबद्दल भाजपचे मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर आणि तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी आविकचे अभिनंदन व कौतुक केले तसेच पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

या गौरवावेळी पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात भाजप युवा नेते दिनेश खानवकर, सुरेशशेठ खानावकर, प्रताप चव्हाण, शंकर वगरे, वासुदेव पाटील, अशोक पाटील उपस्थित होते.

# चीनच्या दिग्गजांना धक्का देत सात्विक-चिराग फायनलमध्ये

**सेऊल : वृत्तसंस्था**

सात्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या भारतीय जोडीने कोरिया ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. सात्विक आणि चिराग यांचा सामना २०२१च्या विश्वविजेत्या चीनच्या वेई केंग लियांग आणि चांग वांग या दुसऱ्या मानांकित जोडीशी झाला. चीनच्या वर्चस्वाला धक्का देत या भारतीय जोडीने हा सामना २१-१५, २४-२२ असा जिंकला आणि प्रथमच स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

भारताचे स्टार बॅडमिंटनपटू सात्विकसाईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी पुन्हा एकदा कमाल करीत चिनी वर्चस्व खालसा केले आहे. भारतीय जोडीने शनिवारी (दि. २२) कोरिया ओपन २०२३च्या पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. कोरिया ओपन सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत सात्विक आणि चिराग जोडीने चीनच्या वांग चान्स आणि लियांग वेईकेंग यांच्यावर शानदार विजय संपादन केला. भारतीय जोडीला अंतिम फेरीत दक्षिण कोरियाच्या सेउंग-जे सेओ आणि मिन-ह्युक कांग किंवा इंडोनेशियाच्या फजर अल्फियान आणि मुहम्मद रियान अर्दियांटो यांच्याशी सामना करावा लागेल.

जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या भारतीय जोडीने जिन्नम स्टेडियमवर ४० मिनिटांच्या धमाकेदार सामन्यात दुसऱ्या मानांकित चीनच्या जोडीला पराभूत केले. सात्विक आणि चिराग यांचा या चिनी जोडीविरुद्धचा हा पहिला विजय आहे. यापूर्वी भारतीय जोडीला दोन सामन्यांत पराभवाला सामोरे जावे लागले होते. दोन्ही जोडींनी उपांत्य फेरीत छोट्या रॅली केल्या आणि संधी मिळताच आक्रमण केले. एक वेळ अशी होती जेव्हा भारत आणि चीनची गुणसंख्या ३-३ आणि ५-५ अशी बरोबरीत होती. त्यानंतर भारताने ७-५ अशी छोटीशी आघाडी घेतली,

### कोरियन ओपन



पण लियांगने आक्रमण सुरूच ठेवले. मध्यंतरापर्यंत भारतीय खेळाडूंना तीन गुणांची आघाडी घेण्यात यश आले, मात्र सात्विक आणि चिराग यांनी १७-११, १९-१२ अशी आघाडी घेतली आणि पहिला गेम २१-१५ असा जिंकला.

दुसरा गेम जरा जास्त चुरशीचा झाला. दोन्ही जोड्या सुरुवातीला २-२ आणि ८-८ अशा बरोबरीत होत्या. त्यानंतर भारतीय जोडीने ११-८ अशी आघाडी घेतली, मात्र चीनच्या खेळाडूंनी दमदार पुनरागमन केले. एक वेळ अशी होती की, दुसरा गेममध्ये गुणसंख्या ही १८-१८, १९-१९, २०-२० आणि २२-२२ अशी बरोबरीत झाली होती. मात्र सात्विक आणि चिराग जोडीने संयम ठेवत अचूक फटका मारत २४-२२ अशी आघाडी घेत सामना जिंकला. माहितीसाठी की, सात्विक आणि चिरागने स्विस ओपन आणि इंडोनेशिया ओपनचे विजेतेपद पटकावले आहे. भारतीय जोडीने या वर्षाच्या सुरुवातीला आशियाई चॅम्पियन्स सुवर्णपदक जिंकले होते.

याआधी या भारतीय जोडीने उपांत्यपूर्व फेरीत जपानच्या ताकुरो होकी आणि युगो कोबायाशी यांचा सरळ गेममध्ये पराभव केला होता. तिसऱ्या मानांकित भारतीय जोडीने अवघ्या ४० मिनिटांत विजय मिळवला. जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकाच्या जोडीने पाचव्या मानांकित जोडीचा २१-१४, २१-१७ असा पराभव केला होता. कोरिया ओपनमधील भारताचे आव्हान केवळ या दोन खेळाडूंवर अवलंबून आहे.



















**खालापूर : दरडग्रस्त इर्शाळवाडीत युद्धपातळीवर शोध व बचावकार्य सुरू आहे. एनडीआरएफच्या पथकांसह शासकीय यंत्रणा आणि सामाजिक संघटना यासाठी कार्यरत आहेत. आपदग्रस्तांसाठी नढाळ येथे तात्पुरते निवारा केंद्र सुरू करण्यात आले आहे. या ठिकाणी स्थानिक आमदार महेश बालदी यांनी जाऊन पाहणी केली.**


॥ भावपुर्ण श्रद्धांजली ॥



स्व. लक्ष्मण गोवर ठाकूर

मृत्यु :- मिती अधिक श्रावण शु. ४, शके १९४५, शुक्रवार दि. २१/०७/२०२३ रोजी

होम विधी

रविवार दि. २३/०७/२०२३ रोजी सकाळी ०९.०० वाजता (राहत्या घरी)

दशक्रिया विधी

रविवार दि. ३०/०७/२०२३ रोजी श्री क्षेत्र नाशिक येथे

उत्तरकार्य विधी

मंगळवार दि. ०१/०८/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता (राहत्या घरी)

शोकाकुल : समस्त ठाकूर परिवार व आप्तेष्ठ

पत्ता: मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड.


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com